बुधवार, १ मे २०२४
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - २४४
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक




MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) WEDNESDAY 1 MAY 2024 | adhunikkesari.com | YEAR-03 • ISSUE-244 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-05

# धनंजय मुंडेंना अनेक 'उद्योगा'तून बाहेर काढले

## लायकी काढत शरद पवारांचा हल्लाबोल

आधुनिक केसरी न्यूज

**विशेष प्रतिनिधी**

**बीड : तुम्ही केले की ते संस्कार आम्ही केले की आम्ही गद्दार ?, असे म्हणत अजित पवार गटाचे नेते धनंजय मुंडे यांनी शरद पवार यांच्यावर तर जाणता राजाला घर नसते. पोरं नसतात. बाळ नसतं. संबंध कुटुंब त्यांचे घर असते. रयत त्याचे घर असते. रयत आणि कुटुंबात निवड करताना कुटुंब निवडायची वेळ का आली ? असा सवाल करत त्यांनी शरद पवार यांच्या कुटुंबियांवरही जहरी टीका केली. या टिकेचा समाचार घेताना शरद पवार यांनी थेट धनंजय मुंडे यांची लायकी काढत त्यांना अनेक उद्योगातून बाहेर काढले. याची जर यादी दिली तर त्यांना फिरणे मुश्कील होईल, अशा शब्दांत धनंजय मुंडे यांच्यावर पलटवार केला.**





एका वृत्तवाहिनीवर मुलाखत देताना निवेदकाने शरद पवार यांना धनंजय मुंडे यांनी त्यांच्यावर व कुटुंबियांवर केलेल्या टिकेसंदर्भात प्रश्न विचारला असता प्रथमतः त्यांनी या प्रश्नावर उत्तर देण्याचे टाळले, पण नंतर शरद पवारांनी शेलक्या शब्दांत धनंजय मुंडेंचा समाचार घेतला.

शरद पवार म्हणाले की, ज्यांची नावे तुम्ही घेता त्यांची लायकी नाही, त्यांना कशा कशातून बाहेर काढले, याची जर यादी दिली तर त्यांना फिरणे मुश्कील होईल. एकंदरीत त्यांनी केलेले उद्योग या सगळ्या गोष्टी मी आता बोलू इच्छित नाही आणि त्यांच्यात लहान कुटुंबातला, लहान समाजातला एक उद्योन्मुख तरुण दिसतो म्हणून त्यांना हाताला धरून विरोधी पक्षनेत्याची जबाबदारी दिली, लोकांची नाराजी होती आणि हे सगळं माहित असतानासुद्धा ते आता माझ्यावर व्यक्तीगत हल्ले करायला लागले, कुटुंबावर हल्ले करायला लागले.

त्याच्यावर मी आता भाष्य करणार नाही, आज शेवटचा त्यांच्याबद्दलचा उल्लेख माझ्याकडून होईल, असे म्हणत शरद पवार यांनी धनंजय मुंडेंवर जास्त बोलणे टाळले.

**काय म्हणाले होते धनंजय मुंडे** : तुम्ही पुलोद सरकार स्थापन केले, ते संस्कार आणि अजित पवार महायुतीबरोबर गेले तर ते गद्दार ? शरद पवारांनी भाजपाशी चर्चा केल्या होत्या . शिवसेनेला बाजूला ठेवण्याचा आग्रह केला . ते सगळे संस्कार होते, आम्ही निर्णय घेतला तर आम्ही गद्दार ? ही निवडणूक भाऊबंदकीची नाही . देशाचा पंतप्रधान ठरवण्याची ही निवडणूक आहे . देशाचा पंतप्रधान मोदी होतील की इतर कोण ? हे ठरवण्याची ही निवडणूक आहे, असे धनंजय मुंडे म्हणाले होते .

**आता कुटुंब का निवडले ?** : देशातील प्रत्येक कॅमेऱ्यासमोर बोलतोय . प्रत्येकाला उत्तर देण्याची तयारी ठेवून बोलतो . ते म्हणतात ( शरद पवार ) दादांनी ( अजित पवार ) गद्दारी केली . दादा गद्दार आहे . आमच्यासारख्यांनी काही बोलले तर लगेच यांची लायकी आहे का ? साहेबांच्या विरोधात बोलावे ? होय, साहेब आमचे दैवत आहेत . आजही जाणते राजा आहेत . जाणता राजाला घर नसतं . पोरं नसतात . बाळ नसते . संबंध कुटुंब त्यांचे घर असते . रयत त्याचे घर असते . रयत आणि कुटुंबात निवड करताना कुटुंब निवडायची वेळ का आली ? असा सवाल त्यांनी शरद पवार यांना केला होता .

# दुग्ध व्यवसायासह राजकीय क्षेत्रात गरुडझेप घेणाऱ्या विकासराव पवार यांना दै. आधुनिक केसरीचा 'आयडॉल महाराष्ट्र' पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज


**सचिन कोरडे**

**धाराशिव :** दुग्ध व्यवसाय करत इतरही विविध व्यवसायात उत्तुंग यश संपादन करत विकासराव पवार यांनी राजकीय क्षेत्रातही गरूडझेप घेतली आहे. ग्रामीण भागात यशस्वी व्यवसाय उभे करून शेतकऱ्यांच्या दुधाला भाव व तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत विकासराव पवार यांनी ग्रामीण भागात जणू विकासाची गंगाच आणली आहे. आपल्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचा ठसा त्यांनी राजकीय क्षेत्रातही उमटवला आहे. समाजसेवा व उद्योग क्षेत्रातील विकासराव पवार यांचे कार्य निश्चितच कौतुकास्पद आणि गौरवास्पद आहे. या कार्याची दखल घेऊन दैनिक आधुनिक केसरीने विकासराव पवार यांना 'आयडॉल महाराष्ट्र' हा पुरस्कार जाहीर केला आहे.



विकासराव पवार यांनी धाराशिव जिल्ह्यातील वाशी येथील ओंकारेश्वर डेव्हलपर्स व शिवरत्न उद्योग समूहासोबतच वाशी तालुका शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघ म. वाशी, श्री शिवाजी मेमोरिअल असोसिएशन, वाशी, शिवरत्न ॲग्रो प्रोड्युसर कंपनी, वाशी, शिवरत्न डेअरी फार्म, वाशी, शिवरत्न अभिनव कृषीपूरक सेवा सहकारी संस्था, वाशी, वाशी कला व क्रीडा मंडळाचे संस्थापक तसेच वाशी येथील कार्यशील नगरसेवक म्हणून समाजामध्ये विविध कार्यातून आपल्या नावाचा ठसा उमटवत असताना, ग्रामीण भागात सुशिक्षित बेरोजगार तरुणांना नोकरीच्याच मागे न लागता आपल्या भागातही करण्यासारखे भरपूर आहे, हे विकासराव पवार यांनी एक आदर्श दुग्ध व्यवसाय उभा करून दुग्ध व्यवसायात घेतलेल्या गरुडझेपेतून सिद्ध केले आहे.

तुम्ही कधी ऐकलंय का, दूध आणि शेण तुम्हाला करोडपती करू शकते, तर हो. हे खरे करून दाखवलंय विकासराव पवार यांनी. एका मोठ्या कंपनीलाही हेवा वाटेल, असा दुग्ध व्यवसाय उद्योग त्यांनी उभा केला आहे.




धाराशिव जिल्ह्यातील वाशी येथील उद्योजक ओंकारेश्वर डेव्हलपर्स व शिवरत्न उद्योग समूहाचे संस्थापक विकासराव पवार यांनी डेव्हलपर्स क्षेत्रात तर गगनचुंबी यश कमावलेच त्याचबरोबर शेतीनिष्ठा कायम ठेवत खरेदी-विक्री संघाचे संचालक होऊन शेतकऱ्यांसाठी शासनाच्या हमीभावात तूर, हरभरा खरेदी केंद्र सुरू केले.

हे सर्व दैनंदिन जीवन सुरू असताना या समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो या भावनेने राजकीय क्षेत्रात कुठलीही राजकीय पार्श्वभूमी घरात नसताना वाशी नगरपंचायतवर नगरसेवक पदाचा बहुमान मिळवला. आज वाशी येथील जनतेमध्ये त्यांची ओळख कार्यसम्राट नगरसेवक अशी आहे. हे सर्व कामकाज अगदी लीलया पार पाडणारे विकासराव पवार यांचे वडील कै. शिवाजीराव पंढरीनाथ पवार यांनी शेतामध्ये एक म्हैस घेतली होती. जिल्ह्यात सकस, आरोग्यदायी, निरोगी व आदर्श दुग्ध व्यवसाय उभा करणाऱ्या विकासराव पवार यांनी वडिलांच्या एका म्हशीपासूनचा प्रवास आज शंभर म्हशींवर आणून ठेवलेला आहे.

दिवसभराचे स्वतःचे दैनंदिन काम करत असताना त्यांचा सकाळचा दिनक्रम आगळा वेगळा आहे. सकाळी चार वाजता ते शेतामध्ये असतात. म्हशी धुणे, शेण काढणे, दूध घरपोहोच करणाऱ्या कामगारांना मदत करणे असा सकाळी आठपर्यंत त्यांचा प्रवास आहे. त्यासोबत शनिवार व रविवारी कार्यालयीन सुटीच्या दिवशी कायम शेतीशी नाळ जोडलेले विकासराव पवार शेती आणि शेतातील कामगार व म्हशींसोबत आनंदात घालवतात. त्यांचा दुग्ध व्यवसायाचा प्रमुख उद्देश हा वाशी शहराला तसेच तालुक्याला म्हशीचे काढलेले सकस, निरोगी आरोग्यदायी दूध हे सर्वसामान्य जनतेला माफक दरात देणे आहे. सर्वांना घरपोच दूध सुविधा देत असताना ज्या तापमानात म्हशीच्या स्तनातून दूध काढले जाईल त्याच तापमानात ग्राहकाला घरपोहोच देण्याची सोय ही विकासराव पवार यांनी त्यांच्या कल्पनेतून केलेली आहे. अशा या युगपुरुषाची दैनिक आधुनिक केसरीच्या 'आयडॉल महाराष्ट्र' पुरस्कारासाठी निवड झाल्याने विकासरावजी पवार यांच्याबद्दल सर्वसामान्य जनतेतून सार्थ अभिमान व्यक्त होत आहे.

## मोदी प्रधानमंत्री कमी प्रचारमंत्रीच जास्त

# खोके-बोके सरकारने मलाई खाण्यापेक्षा दुष्काळाकडे लक्ष द्यावे : नाना पटोले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** काँग्रेसच्या जाहिरनाम्यात धर्माचा उल्लेख कुठेही केलेला नसतानाही पंतप्रधान नरेंद्र मोदी सातत्याने काँग्रेसबद्दल अपप्रचार करत आहेत. काँग्रेस मंगळसूत्र व स्त्रीधन हिसकावून घेऊन मुस्लीमांना देणार अशी विधाने पंतप्रधानांना शोभत नाहीत. सातत्याने खोटे बोलत महाराष्ट्रभर फिरणारे नरेंद्र मोदीच खरे भटकते आत्मा आहेत. मोदींनी कोणती पदवी घेतली हे माहित नाही पण त्यांना जाहिरनामा वाचता येत नसेल तर काँग्रेस त्यांना समजवून सांगेल. काँग्रेसबद्दल सातत्याने खोटे बोलून नरेंद्र मोदींनी जनतेची दिशाभूल करून संभ्रम निर्माण करु नये, असा हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विधानांचा समाचार घेत नाना पटोले म्हणाले की, काँग्रेसने जातनिहाय जनगणना करण्याचे आश्वासन दिले आहे, तसेच सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक सर्वे करणार असल्याचे म्हटले आहे. याआधीही एससी, एसटी समाजाचे आर्थिक, सामाजिक सर्वे करण्यात आले आहेत, त्यावेळी मंगलसुत्र, स्त्रीधन हिरावून घेण्याचा प्रश्न उपस्थित झाला नाही आताच का झाला. संपत्ती करावरूनही मोदी जनतेना चुकीची माहिती देत आहेत. संपत्ती कराबद्दल वाजपेयी सरकारने चर्चा केली होती आणि मोदी यांचे अर्थमंत्री अरुण जेटली, जयंत सिन्हा आणि निर्मला सितारामन यांनीच संपत्ती कर आणण्याचे सुतोवाच केले होते. १० वर्षात सत्तेत असताना मोदींनी काय केले ते सांगावे, देशाची संपत्ती विकून देश चालवला, रुपयाची घसरण झाली तो प्रति डॉलर ९० रुपयांवर गेला. शेतकऱ्यांना फसवले, महागाई, बेरोजगारी वाढवली त्याबद्दल नरेंद्र मोदी काहीच बोलत नाहीत फक्त धार्मिक मुद्द्यावर बोलून समाजात तेढ निर्माण करत आहेत. महाराष्ट्रात एक भटकती आत्मा आहे या पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या विधानाचा समाचार घेताना नाना पटोले म्हणाले की, भटकती आत्मा तर नरेंद्र मोदीच आहेत, त्यांना चैनच पडत नाही, १० वर्ष ते फक्त प्रचारच करत आहेत. दिवसभर सारखे कपडे बदलून फोटोसेशन करणे, कधी समुद्राच्या खाली तर कधी हवेत. असा पंतप्रधान देशाने याआधी पाहिला नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेसवर नाहक टीका करून वेळ वाया घालवू नये. काँग्रेसने देश टिकवला, सांभाळला म्हणून शिंदे आज मुख्यमंत्री होऊ शकले पण मोदी सत्तेत आल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची धोरणे बदलली, जीएसटी लावून जनतेला लुटले व मित्रांचे खिशे भरले. काँग्रेसने शेवटच्या माणसाला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणले आणि भाजपा तर या घटकला पुन्हा विकासाच्या बाहेर फेकत आहे. कांदा निर्यातबंदी उठवलेली नाही, शेतकऱ्यांना मदत केली नाही, पिक विम्याचे पैसे मिळत नाहीत त्यावर सरकारने बोलले पाहिजे. पुण्यात एमपीएससीच्या मुलांना भेडसावणाऱ्या समस्यांवर लक्ष घातले पाहिजे. राज्यात पाणी नाही, दुष्काळ पडला आहे त्याकडे मुख्यमंत्री व सरकारने लक्ष देण्याची गरज असताना खोके-बोके सरकार एकत्र येऊन सत्तेची मलई खाण्यात व्यस्त आहे. देवेंद्र फडणवीसांनी कोणताही शाप दिला तरी तो लागत नाही, त्यामुळे सत्यानाथ होईल या त्यांच्या बोलण्याला काही अर्थ नाही. धनगर, आदिवासी, मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या मोठ्या घोषणा केल्या होत्या त्याचे काय झाले त्यावर बोला, राज्यातील उद्योग गुजरातला पाठवले त्यावर बोला. छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले, बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना काळीमा फासणाऱ्या फडणवीस यांना शाप देण्याचा कोणताही अधिकार नाही, असा टोलाही नाना पटोले यांनी लगावला.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

## वाचकांना विनम्र आवाहन



वृत्तपत्रांच्या जगात दैनिक आधुनिक केसरी ने वेगळेपण जपत वाचकांच्या मनात अढळ स्थान मिळवले आहे. हे स्थान टिकवून ठेवताना व्यवहारी जगात पैशांचे सोंग आणणे मात्र अवघड आहे. त्यामुळे आमच्या लाखो सहृदय वाचकांना आम्ही विनम्र आवाहन करत आहोत की, दैनिक आधुनिक केसरी जर आपल्याला आवडत असेल तर ते सुरू ठेवण्यासाठी


आपण दररोज अगदी 1 रुपयापासून पुढे कितीही रुपयांची मदत आम्हाला करू शकता.

*आपली छोटीशी मदत आमच्यासाठी अनमोल आहे.*

State Bank of India, A/c No. 40533797942, IFS code : SBIN0050896


आपले आर्थिक योगदान खालील फोन पे नंबरवर किंवा क्यूआर कोडवर किंवा खाते क्रमांकावर देऊ शकता.

## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


## बंदिस्त




आधुनिक केसरी

त्याच्या मूलभूत क्षमता, जाणिवा आणि संवेदशीलता यांचा ऱ्हास करण्यासाठी कारणीभूत ठरणार हा मोठा प्रश्न आहे. मला या ठिकाणी पूर्वी वाचलेली एक गोष्ट आठवते. एक अत्यंत श्रीमंत जमीनदार असतो. त्याला एकुलता एक मुलगा असतो. त्या मुलाचे तो सगळे लाड पुरवतो. त्याला हव्या त्या गोष्टी लगेच उपलब्ध करून देतो. पैसा, ऐश्वर्य, नोकरचाकर कशाकशाचीही ददात नसते. त्या मुलाला गरिबी, उपासमार, दुःख, दारिद्र्य, दैन्य काहीकाही माहित नसते. त्या जमीनदाराला एक दिवस वाटते की जगात किती गरिबी, दारिद्र्य आहे हे आपल्या मुलाला दाखवावे आणि त्याला याची जाणीव करून द्यावी की इतरांच्या तुलनेत आपण किती श्रीमंत आहोत, भाग्यवान आहोत. मग तो जमीनदार आपल्या मुलाला आपल्या शेतावर काम करणाऱ्या मजुराच्या घरी राहण्यासाठी काही दिवस पाठवतो. त्यासाठी तो मुलगा आपले शहर सोडून खेडेगावात राहण्यास येतो. तेथील सगळे वातावरण त्याला खूप आवडते. छोटंसं घर, मोकळं शेतशिवार, मोकळी आणि स्वच्छ हवा, झुळझुळ वाहणारी नदी, खाण्यासाठी साधे पण ताजे आणि चवदार अन्न. रात्री खाटेवर पडल्यावर दिसणारे आकाशातील चंद्रतारे. या सगळ्या गोष्टी त्याच्या मनाला खूप भावतात. त्या शेतमजुराची लहान मुले त्याचे सवंगडी होतात. त्यांच्याकडून तो बऱ्याच नवीन गोष्टी शिकतो. काही दिवसांनी तो जमीनदार आपल्या मुलाला परत बोलावतो. तो त्या मुलाची खरं तर आता तिथून निघण्याची इच्छा होत नाही पण वडिलांनी बोलावले म्हणून तो जातो.

## हितगुज





पुष्प ५३वे

गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)

### तरुण पिढी आणि चंगळवाद

अनुभवांनी अपरिपक्व परंतु मानसिक तीव्र भावावेगाने झपाटणारी तरुण पिढी विध्वंस प्रवृत्ती व चंगळवादी मनोवृत्तीची शिकार बनते आहे. त्यांच्यासाठी हे विचारमंथन आवर्जून होते आहे. प्रत्येक माणसात लढाऊ बाणा आहे, क्षात्रतेज आहे. प्रत्येक प्रतिभावंत आहे. या भावना युवकांमध्ये घट्ट रुजवून त्यांना सकारात्मक व दूरदर्शी विचार करायला लावणे हे काळाने दिलेले कर्तव्य आहे. सामुदायिक सहजीवनाचे ते एक कार्य उद्दीष्ट आहे. अशा व्रतस्थ वृत्तीने दिंडोरी प्रणीत सेवामार्गात युवा-प्रबोधनाचे कार्य केले जाते आहे. भगवान श्री स्वामी समर्थ महाराज 'भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे' म्हणतात. तेव्हा अभिप्रेत असते की तू प्रतिकूलतेशी संघर्ष कर, तू अन्यायाचा विरोध कर, तू आंतरिक सामर्थ्य वाढव, तू निराशेने, दुःखाने खचून जाऊ नकोस, तुझा विवेक मलीन करू नकोस, मानवता सोडू नकोस, विकारांच्या आहारी जाऊ नकोस. अशी मनोवृत्ती श्रद्धामय, आस्थामय मनोवृत्ती असते. त्यांनाच ईश्वराचा आधार मिळतो; कारण त्यांची सत्यनिष्ठा कुठल्याही परीक्षेने डगमगत नाही की अनन्यता भंग होत नाही. अशा सेवेकऱ्यांचा सदैव आधार, पाठबळ श्री स्वामी महाराज आहेत. म्हणून अशी मनोवृत्ती धारण करून त्याचे चालते-बोलते कर्मनिष्ठ आदर्श युवकांसमोर उभे करणे हे सर्व पालकांचे, ज्येष्ठ सेवेकऱ्यांचे कर्तव्य आहे. प्रत्येक आई-वडिलांना आपला मुलगा श्रीराम, श्रीकृष्ण व्हावा असे वाटते, प्रत्येक मुलगी लक्ष्मी, सरस्वती असावी असे वाटते. तर आपण त्यासाठी 'पालक' म्हणून काय देत आहोत, याचा अंतर्मुख होऊन विचार करणे गरजेचे आहे. 'पालक' होणे म्हणजे विष्णुत्वाची शक्ती धारण करणे. ती एक साधना, जागरूकता, तपश्चर्या आहे, अशा आध्यात्मिक भावनेने कर्तव्ये समजून पार पाडावी लागतील.

संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक
संपर्क क्र. ९९२२४२००३४


## आनंदी पहाट




### समजूतदारपणा व दयाळूपणा बोलण्यातून दिसतो

आधुनिक केसरी

नकारात्मक विचार आपले वजन कमी करतात आणि आपल्या व्यावसायिक तसेच वैयक्तिक जीवनावर परिणाम करू शकतात. नकारात्मक मानसिकता सकारात्मक दृष्टिकोनाकडे वळवण्यासाठी सराव करत राहणे आवश्यक असते. अपयशी होण्याचा एकमेव मार्ग म्हणजे अनुभवातून काहीही शिकणे होय. अपयशांना शिकण्याच्या अनुभवांमध्ये बदलण्यावर आपली उर्जा केंद्रित करावी. जेव्हा आपण आव्हानात्मक परिस्थितीचा सामना करतो तेव्हा अनुभवातून शिकलेल्या, घेतलेल्या धड्याचा आपल्याला उपयोग होतो. स्वतःबद्दल खूप कठोर असणे खरोखर आपल्या कार्यक्षमतेत अडथळा आणू शकते. स्वतःशी अधिक दयाळूपणे वागणे हा तुमच्या मनाला यश मिळवून देण्याचा सर्वोत्तम मार्ग असू शकतो. सुधारित मनोवैज्ञानिक कल्याण आणि शरीराच्या चांगल्या प्रतिमेपासून वाढीव आत्म-मूल्य तसेच वाढीव प्रेरणा या सर्व गोष्टींशी आत्म-करुणा जोडलेली असते. म्हणून, स्वतःशी समजूतदार आणि दयाळूपणे बोलण्याची सवय लावावी. आमचा अंतर्गत संवाद अनेकदा नीट आणि पूर्णपणे होत नाही. आपण ज्याची काळजी घेतो, त्याच्याशी कसे बोलायचे, हेच समजून घेत नाहीत. स्वतःशी बोलणे इतरांशी बोलण्यापेक्षा खूप वेगळे असते. हे विशेषतः परिपूर्णतावादी लोकांसाठी खरे आहे. स्वतःची टीका न करण्याचे आपण नेहमीच लक्षात ठेवावे. आपण अयशस्वी झाल्याबद्दल किंवा चुकल्याबद्दल स्वतःला दोष देण्याऐवजी, आपण विश्वासू मित्राला द्याल तोच सल्ला स्वतःला देण्याचा प्रयत्न करावा. शारीरिक स्तरावर, नवीन गोष्टी शिकणे आपली मेंदूसाठी निरोगी ठरत असते. नवीन कौशल्ये शिकल्याने आपल्या स्मृती स्नायूंना वाकवण्यास आणि एकूण आठवण सुधारण्यास मदत होते. हे मेंदूतील न्यूरॉन्सला उत्तेजित करते, अधिक मज्जासंस्थेचे मार्ग तयार करते आणि विद्युत आवेग त्यांच्या ओलांडून वेगाने प्रवास करू देते. या दोन गोष्टी एकत्र केल्यानेआपल्याला अनेक गोष्टी लवकर शिकण्यास आणि नवीन परिस्थितींशी आत्मविश्वासाने जुळवून घेण्यास मदत होते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### जीवशिवानंदा | भेट झाली ||


आनंदी मनाचे | आनंदी सोहळे ||
आनंद उसळे | शुद्ध मनी ||१||
आनंदी नदीला | आनंदाचा घाट ||
आनंदाची वाट | पंढरीची ||२||
आनंदाचे सूर | गाता अभंगात ||
आनंदी टाळात | ब्रह्मानंद ||३||
आनंदी गावचा | आनंदी प्रवासी ||
आनंदी संतांसी | एकरूप ||४||
विठुच्या नामाचा | आनंदी गजर ||
आनंदी माहेर | आनंदले ||५||
आनंदी नामाचा | आनंदी मी भक्त ||
आनंदाचे सुक्त | हरिपाठ ||६||
आनंदी देहात | वसे भक्तानंद ||
जीवशिवानंद | भेट झाली ||७||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

सागर जल का रासि है,
सो नहिं तवला जाय ।
अकथ अलौकिक सेन्धु सुख, कहन सुनन
किमि आय ।।०२।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल
पंचम अध्याय) ०४/०५/०२
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
समुद्र पाण्याचे भंडार आहे, त्याला कसे मोजता येईल ? तद्वतच ब्रह्मसुख अकथ, अलौकिक आहे, त्याचे कथन आणि श्रवण कसे होऊ शकेल ?



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## गुणरूपनिरूपण

आधुनिक केसरी

वरती मी म्हणाले आहे की या विश्वातील विलक्षण पणा हा एक कधीच न सोडवता येणारा गुंता आहे. आपण त्याचा जितका विचार करू तितके त्यांमध्ये वैविध्य आढळते. काळा पांढरा रंग एकत्र केला की त्यापासून पारवा रंग मिळतो. काळा व पिवळा रंग एकत्र केला की हिरवा रंग तयार होतो. म्हणजेच रंगांचे मिश्रण एकत्र केले की मूळ रंग बदलतात व नवीन रंग तयार होतात. यावरून असे लक्षात येते की मुळातचं दृष्य विकारवंत असल्याने त्यामध्ये बदल होऊन नवीन नवीन दृष्यवस्तू बनत रहातात. पंचमहाभूतापैकी पाणी हे एक भूत आहे. समुद्र, नदी, तलाव, आड, विहिरी,धरणे ही सर्व पाणी मिळण्याची साधने आहेत. मुळात पाणी एकच असते. परंतू त्यावर तरंग उमटू लागतात. तरंगाच्यामध्ये पटकन बदल होऊ लागतात हे बदल सांगणे अवघड आहे. पाण्याची अवाढव्यता जर एवढी मोठ्ठी आहे तर बाकीच्या भूतांचा पसारा किती मोठा असु शकतो ह्याची आपल्याला कल्पनाही करता येत नाही.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# भवरोगापासून मुक्ततेचा उपाय - सत्संगती व नामस्मरण

आधुनिक केसरी

एका गावात एक वैद्य राहात होता. त्या वैद्याला कोणाला काय रोग झाला आहे हे तोंडावरून समजत असे. त्याने एक दिवस एका मनुष्याला आपल्या घरावरून जाताना पाहिले आणि त्याला आत बोलावले. वैद्याने त्या माणसाला सांगितले की, "तुला एक भारी रोग झाला आहे; पण मी सांगतो ते औषध घे आणि मी सांगेन त्याप्रमाणे पथ्य पाळ, म्हणजे तुझा रोग बरा होईल." वैद्याने सांगितलेले औषध आणि पथ्य त्या मनुष्याने पाळले नसते तर त्यात त्या वैद्याचे काही नुकसान होते का ? त्याप्रमाणेच संतलोक जे आपल्याला करायला सांगतात, त्यात त्यांना स्वतःला काही मिळवायचे असते का ? आपल्याला गुरू सांगत असतात, त्यांचे ऐकल्याने आपलाच फायदा होत असतो. ते आपल्याला भवरोग झाला आहे असे सांगतात आणि त्याकरिता संतसंग करा आणि नामात राहा म्हणून सांगत असतात. ते जे सांगतात ते स्वतः अनुभव घेऊनच सांगत असतात. औषध सोपे असले म्हणून त्यात गुण नाही असे म्हणून कसे चालेल ? तुकारामांनी आपल्या



उपासनेची शपथ घेऊन सांगितले आहे की, नामस्मरणासारखे सोपे साधन नाही. तुमचा हल्लीच्या साधूंवर विश्वास नसला तरी समर्थ आणि तुकाराम यांनी सांगितले त्यावर तरी विश्वास ठेवायला काय हरकत आहे ? त्यांनी तुमच्या कल्याणाकरिताच ते साधन सांगितले आहे. ते तुम्ही न कराल तर त्यांचे काही नुकसान नाही, तुमचेच नुकसान आहे; तरी त्याचा विचार करा. आपल्याला रोग झाला आहे अशी आपली अगोदर खात्री झाली पाहिजे, म्हणजे निम्मे काम झाले. आपल्याला रोग झाला आहे असे पक्के कळल्यावर आपण औषध घेण्याचे टाळणार नाही. संसारात सुख नाही असे आपल्याला दिसत असताना, ज्या योगाने सुख मिळेल त्याच्या खटपटीला लागले पाहिजे. त्याकरिता होईल तितके नामात राहण्याचा प्रयत्न करा, म्हणजे तुम्हाला खरे समाधान मिळेल. एका मनुष्याने तीस वर्षे मनापासून नोकरी केली. तो म्हणाला, "भगवंताची पूजा आणि भक्ती कशी करावी हे मी नोकरीपासून शिकलो." त्याला विचारले, "ते कसे ?" तेव्हा त्याने उत्तर दिले, "नोकरीमध्ये वरिष्ठांच्या मर्जीप्रमाणे वागावे लागते. तो जिथे बदली करील तिथे आपल्याला जावे लागते; मग घरात अडचण असली तरी तिथे आपले काही चालत नाही. म्हणजे आपलेपण बाजूला ठेवावे लागते. आता मी सेवानिवृत्त झाल्यावर मालक तेवढा बदलला. आता मी वरिष्ठाच्या ठिकाणी भगवंताला ठेवले आहे. भगवंत हा श्रेष्ठ वरिष्ठ आहे, कारण तो माणसासारखा स्वार्थी नाही. तो अत्यंत निःस्वार्थी असल्यामुळे माझ्या हिताचेच नेहमी घडवून आणतो. म्हणून मी आता अत्यंत आनंदात आहे." याचप्रमाणे प्रत्येक माणसाने आपल्या प्रपंचापासून परमार्थ करायला शिकले पाहिजे. हेच आपल्या जीविताचे सार आहे.

**११०. अनन्यतेशिवाय भगवंताची प्राप्ती नाही; त्यातच भक्ति जन्म पावते.**

## निरूपण

आधुनिक केसरी

वृश्चिक गोंबी आजगर । वाहोन जाती ॥५२॥
तयामधें प्राणी सांपडला । खडकी बेटीं आडकला ।
बुडत बुडत वांचला । या नांव आदिभूतिक ॥५३॥
मनासारिखा नसे संसार । कुरूप कर्कश स्त्री क्रूर ।
विधवा कन्या मूर्ख पुत्र । या नांव आदिभूतिक ॥५४॥
भूत पिशाच्च लागलें । आंगावरून वारें गेलें ।

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
बुधवार, १ मे २०२४
adhunikkesari.com

# प्रा.सुरेश नवलेंच्या हाती तुतारी

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** मोठ्या विश्वासाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंसोबत आम्ही गेलो परंतू त्याचा काहीच उपयोग झाला नाही. भाजपच्या राजकीय दबावाला बळी पडून शिवसेना खिळखिळी होत असल्याचं दुःख माझ्यासह शिवसैनिकाला न पचणारं आहे. उद्याच्या लोकसभा निवडणूकीत बीड मतदारसंघामध्ये आम्ही मविआचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना पाठिंबा देत असून त्यांच्या विजयावर शिक्कामोर्तब करण्यासाठी प्रा.सुरेश नवले मित्रमंडळाच्या वतीने कार्यकर्ते जिवाचे रान करतील असा विश्वास प्रा.सुरेश नवले यांनी बोलून दाखविला. मित्रमंडळाच्या सर्व कार्यकर्त्यांची भावना लक्षात घेवूनच आपण हा निर्णय घेत असल्याचेही नवले यावेळी म्हणाले. बीड शहरातील सुर्या लॉन्स या ठिकाणी आयोजित कार्यकर्ता संवाद मेळाव्यात ते बोलत होते.

यावेळी बोलताना प्रा.सुरेश नवले पुढे म्हणाले, स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांना पुढे नेण्याचं काम मुख्यमंत्री एकनाथ शिंदे करत आहेत असा विश्वास आम्हाला होता परंतू काही दिवसांमध्ये आमचा भ्रमनिरास झाला. शिवसेनेमध्ये काम करत असताना पक्ष संघटन वाढविण्यासाठी जबाबदारी देण्याचे वचन मुख्यमंत्र्यांनी आम्हाला दिले होते परंतू त्यांनी फक्त पक्षामध्ये आम्हाला बसवून ठेवण्याचे काम केले. त्यामुळे आमच्यासह कार्यकर्त्यांचीही निराशा झाली. जो विचार ठेवून आम्ही शिवसेनेमध्ये आलोत त्याच विचारालो मुठमाती देण्याचं काम नेतृत्वाकडून होत आहे. भाजपने शिवसेनेला प्रत्येक वेळी खाली दाखविण्याचं काम सुरू केले आहे. त्यांच्यावर कसल्याही प्रकारचा अंकुश मुख्यमंत्र्यांचा राहिलेला नाही. त्याचाच परिपाक म्हणून सध्या चालू असलेल्या लोकसभा निवडणूकीत शिवसेना पक्षाच्या अनेक विद्यमान खासदारांना देखील मुख्यमंत्री उमेदवारी मिळवून देवू शकले नाहीत. याचा प्रचंड रोष सर्व शिवसेना पदाधिकारी आणि कायकर्त्यांमध्ये आहे. खर्या अर्थाने जनतेमध्ये जावून काम करणार्या लोकप्रतिनिधींनाच संधी मिळत नसल्याने त्यांचं राजकीय आयुष्यात मातेरे झाले. शिवसैनिकांची मोठी अपेक्षा होती की शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराप्रमाणे शिवसेना चालेल परंतू तसे होताना दिसत नाही. सामान्य शिवसैनिकांना न्याय मिळत नाही. भारतीय जनता पार्टीच्या दबावाला झुगारून शिवसैनिकांना मुख्यमंत्री न्याय देतील अशी अपेक्षा होती परंतू तीही फोल ठरल्याचे दिसत आहे. शिवसेना मुख्यमंत्री चालवतात की भाजप? असा संभ्रम आता निर्माण झाला असून भाजप आपला पक्ष बळकट करत असताना शिवसेनेला मात्र खिळखिळी करत आहे. दुर्दैवाने भाजपच्या राजकीय दबावाला मुख्यमंत्री बळी पडलेले दिसत असल्याचंही यावेळी प्रा. नवले म्हणाले. मेळाव्याच्या सुरूवातीलाच काही कार्यकर्त्यांनी आक्रमपणे आपल्या भूमिका मांडल्या. ज्या ठिकाणी सन्मान होत नाही त्या ठिकाणी थांबायचे कशाला असाही सूर कार्यकर्त्यांमधून व्यक्त होत होता. याच अनुषंगाने देखील विचार करत आपण मविआचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना आपला पाठिंबा जाहीर करू असे कार्यकर्त्यांचे म्हणणे होते. त्यामुळेच याच ठिकाणी प्रा. सुरेश नवले यांनी देखील कार्यकर्त्यांच्या मताचा आदर करून सोनवणे यांना जाहीर पाठिंबा दिला. यावेळी मोठ्या संख्येने प्रा. सुरेश नवले मित्रमंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते.




**लोकसभेत ही अवस्था तर** : लोकसभेच्या निवडणूकीमध्ये ही अवस्था तर 288 जागेच्या विधानसभेच्या निवडणूकीत काय अवस्था राहील याची कल्पना जरी केली तरी शिवसेनेच्या भविष्याचा अंदाज येतो. शिवसेना चर्चेच्या तहामध्ये पूर्णत: हरलेली असून याचा फफटका निश्चितच पक्षाला बसलेला असल्याचेही प्रा. नवले यावेळी म्हणाले. भाजपच्या भट्टीत...जेव्हापासून एकनाथ शिंदे यांनी भाजपची स्वतंत्र साथ पकडली आहे तेव्हापासून शिवसैनिकांची कुचंबना होत असल्याचे दिसून येत असून आजच्या लोकसभा निवडणूकीत सुध्दा अनेक ठिकाणी याचा प्रत्यय येत आहे. कार्यकर्ता संवाद मेळाव्याच्या ठिकाणी लावण्यात आलेल्या 'भाजपच्या भट्टीत शिवसैनिकांचे बळी' हे बॅनर्स विशेष लक्ष वेधणारे ठरले. नेहमीच आपल्या वक्तृत्वाने सभा खिळवून ठेवणार्या प्रा. सुरेश नवले यांच्या या बॅनरचीही चर्चा मोठ्या प्रमाणात होत आहे.

***तू भी एक सिकंदर है !***

प्रा.सुरेश नवले यांचे भाषण म्हणजे कार्यकर्त्यांसाठी एक बळ देणारी पर्वणीच असते. भाषणा दरम्यान त्यांनी एक उर्दूमधील शेर म्हटला आणि उपस्थित कार्यकर्त्यांनी देखील याला भरभरून दाद दिली.

***तजुर्बा कह रहा हूँ दोस्त ये गम, ये डर, ये दर्द सबकुछ तेरे अंदर है। खुद बनाये इस पिंजरे से निकल कर देख तू भी एक सिकंदर है।***

सध्या शिंदे सेनेच्या बाबतीत हा शेर तंतोतंत लागू पडल्याचे चित्र पहावयास मिळत असल्याच्या प्रतिक्रिया देखील कार्यकर्त्यांमधून मेळाव्याच्या ठिकाणी व्यक्त होत होत्या.

# निवडणूक खर्च लेखे तपासणी वेळापत्रक जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** शिर्डी लोकसभा मतदारसंघात निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांचे निवडणूक खर्च तपासणीसाठी वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. ३ मे, ७ मे व ११ मे २०२४ रोजीच्या दिनांकास सकाळी १० ते सायकांळी ५ या वेळेत उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी त्यांच्या खर्चाचा हिशोब सादर करावा. असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी बाळासाहेब कोळेकर यांनी केले आहे. शिर्डी लोकसभेचा उमेदवारी अर्ज भरलेल्या उमेदवारांनी त्यांची दैनंदिन खर्चाची नोंदवही



संपूर्ण प्रचार कालावधीत किमान तीन वेळा खर्च निरीक्षकांसमोर सादर करणे आवश्यक आहे. जे उमेदवार निवडणूक खर्चाचे लेखे तपासणीकरिता सादर करणार नाहीत त्यांच्यावर लोकप्रतिनिधीत्व कायद्यातील १९५१ बाब क्र.७७ मधील तरतुदीनुसार कारवाई करण्याबाबत निवडणूक आयोगाच्या सूचना आहेत. शिर्डी लोकसभेतील उमेदवारांच्या खर्च लेख्यांची तपासणी ३ मे, ७ मे व ११ मे २०२४ या तारखेला निवडणूक खर्च सनियंत्रण कक्ष, उपकोषागार कार्यालय, प्रशासकीय इमारत, राहाता येथे केली जाणार आहे. या तारखांना सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी त्यांच्या दैनंदिन खर्चाच्या नोंदवह्या, देयके, प्रमाणके यांच्यासह उपस्थित राहावे. असे आवाहन श्री.कोळेकर यांनी केले आहे.



आधुनिक केसरी न्यूज

**शिवसेना शिंदे गटाचे पदाधिकारी गणेश शेळके यांनी आपल्या सहकाऱ्यांसह आ.कैलास गोरंटयाल यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षात प्रवेश केला. यावेळी त्यांचे आ.गोरंटयाल यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.**









# रामदेवबाबांना धक्का

आधुनिक केसरी

योगगुरु रामदेवबाबा आणि पतंजली आयुर्वेद संस्थेचे संचालक आचार्य बाळकृष्ण यांनी नुकतीच सर्वोच्च न्यायालयात बिनशर्त माफी मागितली. तसेच वर्तमानपत्रात दिलगिरी व्यक्त करणारी जाहिरातही छापली. त्यानंतर बाबा रामदेव यांना आणखी एक धक्का बसला आहे. उत्तराखंड सरकारच्या आयुर्वेदिक आणि युनानी सेवा राज्य परवाना प्राधिकरणाने (SLA) पतंजली आयुर्वेद लिमिटेड आणि दिव्या फार्मसी या कंपनीच्या १४ उत्पादनांचा परवाना रद्द केला आहे. 'औषध आणि प्रसाधने कायदा, १९४५' यामधील तरतुदींचा वारंवार भंग केल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली असल्याचे उत्तराखंडमधील राज्य परवाना प्राधिकरणाने सोमवारी (दि. २९ एप्रिल) सर्वोच्च न्यायालयात सांगितले. प्राधिकारणाने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात म्हटले की, आम्ही १५ एप्रिल २०२४ रोजी दिव्या फार्मसी आणि पंतजली आयुर्वेद लिमिटेडचे परवाना रद्द करणारा आदेश काढला आहे. पतंजलीच्या श्वासारी गोल्ड, स्वासारी वटी, ब्रोंकोम, श्वासारी प्रवाही, श्वासारी अवलेह, मुक्त वटी एक्स्ट्रा पॉवर, लिपिडोम, बीपी ग्रीट, मधुग्रीत, मधुनाशिनी वटी एक्स्ट्रा पॉवर, लिवामृत एडवांस, लिवोग्रिट, आईग्रिट गोल्ड आणि पतंजली दृष्टी आय ड्रॉप या उत्पादनांचा परवाना तात्काळ रद्द करण्यात आला आहे. भारतीय वैद्यकीय संघटनेने दाखल केलेल्या याचिकेवर गेल्या काही दिवसांपासून सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. न्यायमूर्ती हिमा कोहली आणि न्यायमूर्ती अमानतुल्ला यांच्या खंडपीठाने १० एप्रिल रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान उत्तराखंड परवाना प्राधिकारणाने काय कारवाई केली, याचा जाब विचारला होता. यावर उत्तर देताना प्राधिकारणाने म्हटले की, १६ एप्रिल रोजी हरिद्वारच्या जिल्हा आयुर्वेदिक आणि युनानी अधिकारी यांनी स्वामी रामदेव, दिव्या फार्मसी आणि पतंजली आयुर्वेद लिमिटेडच्या विरोधात औषध आणि प्रसाधने कायद्याच्या कलम ३, ४ आणि ७ अनुसार फौजदारी तक्रार दाखल केली आहे. प्राधिकरणाने पुढे म्हटले की, २३ एप्रिल रोजी उत्तराखंडमधील सर्व आयुर्वेदिक आणि युनानी औषधांच्या कारखान्यांना नोटीस पाटविली आहे. प्रत्येक आयुर्वेदिक आणि युनानी औषध निर्मात्या कंपन्यानी आयुष मंत्रालयाने दिलेल्या निर्देशांचे आणि औषधे व प्रसाधने कायद्याच्या तरतुदीचे पालन करावे, असे या नोटिशीत नमूद करण्यात आले आहे.

# महाराष्ट्र आणि मायबोली देदीप्यमान होवो...!



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**आज महाराष्ट्र दिन आणि मराठी राजभाषा दिन! आजच्या दिवशी महाराष्ट्र राज्य निर्मिती आणि माय मराठी महाराष्ट्राची राज भाषा म्हणून मान्यता पावली आहे! भारतवर्षाच्या इतिहासाबरोबरच महाराष्ट्राचा इतिहास तेवढाच गौरवशाली आणि वैभवशाली आहे! भारताच्या नकाशात अगदी मध्यभागी असणारे महाराष्ट्र राज्य आपली वेगळी ओळख सदैव टिकवून आहे. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, भौगोलिक आणि सर्वच बाबतीत महाराष्ट्र आपले अस्तित्व सिद्ध करतांना कुठेही पिछाडीवर नाही.**

आज महाराष्ट्राची राजधानी मुंबई ही संपूर्ण देशाची आर्थिक राजधानी म्हणून मान्यता पावली आहे. मुंबई आणि कोल्हापूर येथील चित्रनगरी आजही संपूर्ण जगाला भुरळ घालते आहे! हॉलीवूड सारख्या बॉलीवूड शब्दाची निर्मिती इथल्या जादुई नगरी मुंबईचीच! त्यामुळे संपूर्ण जग जीवाची मुंबई करण्यासाठी मुंबईला येतेच येते! इतिहासात देशाला या मातीने अनेक हिरे माणिकांची माला अर्पण केली आहे. छत्रपती शिवराय, क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले आणि ज्यांच्या राज्यघटना लेखणीवर संपूर्ण भारताची मदार अबाधित आहे असे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर याच मातीने उपजविले आहेत. दिवसेंदिवस डॉ.बाबासाहेब जगात आणखीनच प्रकाशमान होत असून त्यांच्यावर जगभर संशोधन सुरूच आहे. एवढेच काय( ?), गान कोकिळा, गान सम्राज्ञी लता मंगेशकर, क्रिकेटचा बादशहा सचिन तेंडूलकर, सुपर संगणकाचे निर्माते डॉ.विजय भटकर इत्यादी आणि अन्य अनेक महान लोकांनी इथल्या मातीतून उगवून भारत देशाची कीर्ती जगात उज्वल केली आहे! राकट, कणखर, लढाऊ आणि बुद्धिमान असणाऱ्या लोकांची खाण महाराष्ट्र राज्य देशात सदैव झळकत असतो. महाराष्ट्राचा मौर्य-अशोक-यादव हा मोठा देदिप्याम्न कालखंड राहिला आहे. त्याला जोडून अठरापगड जातींची एकसंध वज्रमुठ बांधून छत्रपती शिवाजी महाराजांनी इथे मराठी अस्मितेचे, रयतेच्या हक्काचे मराठी साम्राज्य उभे करून सर्वकाळ महाराष्ट्राच्या शिरपेचात सन्मानाचा तुरा खोवला आहे! पेशवाईचा अस्त झाल्यानंतर मधला काळ इथल्या रयतेसाठी खडतर गेला. यवन आणि ब्रिटीशांची सत्ता महाराष्ट्राला झळा देऊन गेली. त्यानंतर देशात स्वातंत्र्याचे वारे वाहतांना इथल्या सुधारक आणि स्वातंत्र्यवीरांनी पुन्हा आपला कणखर बाणा दाखवतांना ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले. बाबू गेनू सैद या क्रांतीविराने बलिदान देऊन इंग्रजांच्या विरोधात जन प्रक्षोभ उभा केला. बाबू गेनूंच्या बलिदानाने शेजारच्या गावातील राजगुरू क्रांतिकारक हे घरातून सरळ स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होतांना क्रांतिवीर भगत सिंग आणि सुखदेव यांच्याबरोबर देशासाठी समर्पित झाले. अशी ही बलिदानाने आणि बहुआयामाने समृद्ध असणारी महाराष्ट्र भूमी आणि तिचा गौरवशाली इतिहास सर्वकाळ देशाला आणि आपल्या सर्वांनाच नित्य नित्य उर्जा देत असतो. त्याच्या जोडीला इथला भूगोलही तेवढाच विस्मयकारी आणि विशेष आहे. इथे वेरूळ, अजंता, औंढा नागनाथ सारखी जगप्रसिद्ध शिल्पे मोठ्या दिमाखाने उभी असून ही स्थळे महाराष्ट्राचे श्रेष्ठत्व सदैव अधोरेखित करत असतात. यासह छत्रपती शिवरायांनी उभारलेले अनेक गड-किल्ले आपला राकट, लढाऊ इतिहास जिवंत ठेवून आहेत. त्याच्या जोडीला इथली मायबोली मराठीही तेवढीच समृद्ध आणि श्रीमंत आहे! मायबोली मराठी आपल्या उदरात प्राचीनतत्व घेऊन नित्यनेमाने अर्वाचीन आणि आधुनिकतेला उपजवितांना आपले नवनवोन्मेष स्वरूप उजळते आहे. ज्ञान मंदिरात नंदादीप पाजळत आहे. चक्रधर, महाधंबा, मुकुंदराज, म्हाइंभट, नामा, जना, ज्ञाना, चोखा, सावता, गोरा, मुक्ता, निवृत्ती, बंका, कान्होपात्रा, एका, तुका, रामदास, दासोपंत आदि महानुभावांनी अखंड शब्दसाधना करतांना मायबोली मराठीच्या दीपात सुंदर शब्दांच्या अनंत वाती चेतवून इथला आसमंत नवचेतनेने प्रज्वलित केला आहे. अशा समृद्ध भाषेला अलीकडे कोसंबी, फुले दांपत्य, सावरकर, रानडे, बापट, बहिणाबाई, बाबासाहेब, टिळक, साठे, अत्रे, फडके, शिरवाडकर, केशवसुत, देसाई, करंदीकर, माडगुळकर, खांडेकर, थत्ते, मर्ढेकर, तांबे, बहिणाबाई, गडकरी, कुलकर्णी, तेंडूलकर, देशपांडे, साने गुरुजी, भावे, कांबळे, नारळीकर, काळे, भागवत, बोराडे, यादव, संत, अवचट, मनोहर, भट, पानतावणे, कोतापल्ले ते अगदी वर्तमानातील देशमुख, भालेराव, मुलाटे, लोमटे इत्यादी आणि अन्य अनेक महाराष्ट्राच्या भूमिपुत्रांनी इथली




अक्षरगाथा आपल्या पूर्वजांना शोभेल अशीच उत्तमोत्तम निर्माण केलेली आहे.

एवढे सगळे करतांना आपल्याला फार मोठे काम करायचे नाही. नंदादीप जळतो आहे. आपल्याला सर्वकाळ सोज्वळ प्रकाशित मायबोलीच्या दिव्यातील वात पुढे सरकवून त्यातील तेल कमी होऊ द्यायचे नाही. लाही लाही तापल्यानंतर पहिल्या श्रावण सरींनी येणारा मृदगंध काळजात जपून ठेवतांना त्याला लोभस शब्दरूप द्यायचे आहे. त्याच्या जोडीला तो मधुर गंध जीवनाला नव्या दिशा देणारा राहायला हवा यासाठी लेखणी बंद होता कामा नये. ज्याप्रमाणे घाम आणि मातीतूनच अनेक सुखांची निर्मिती होत असते त्याच न्यायाने माय मराठीच्या साधनेने इथे कल्पित स्वर्गातील अमृत्पेक्षाहि आनंददायी शब्दांची निर्मिती होत राहणे काळाची नितांत गरज आहे. असे होणे म्हणजे खऱ्या अर्थाने मानवी जीवनाला नव सुगंध देणे होय. मानवी जीवन मोठे विलोभनीय आणि विस्मयकारी आहे. त्या सचेत, सत्चिदानंद चेतनेचे आंबट, गोड, खारट, तुरट अनुभूतीत प्रकटीकरण शब्द लालीत्याने करतांना मानवी जगण्याला नवांकुर फोडण्याचे काम आपण सर्व सृजानांनी करणे क्रमप्राप्त आहे. आत्तापर्यंत महाराष्ट्राने आणि मायबोली मराठीने अनेक कवी, कादंबरीकार, नाटककार, निबंधकार, समीक्षकांना जन्म देताना मातृ गौरव वृद्धिंगत केला आहे. मृदगंध ते फुलाच्या रंग-रूप-गांधातील काव्यरूपाचे चित्र सचित्र करण्याचे काम इथे सातत्याने होत आहे.

महाराष्ट्र आणि मायबोलीचा गौरव वाढवतांना आपले ह्रदय आणखी विशाल करावे लागणार आहे. परिस्थिती आणि समाजाने जंगजंग छळले असतांना सृजन सुपुत्र ज्ञानोबा-तुकोबा आपल्या असीम सामाजोत्थानाच्या ध्येयापासून तसूभरही ढळले नाहीत. स्वतःच्या जगण्याची इभित झाली तरीही "जगाच्या कल्याणा त्यांच्या विभूती शब्दांनी" अभूतपूर्व क्रांती घडवून महाराष्ट्र मन भानावर ठेवण्याचे महत्कार्य केले! हा वाग्यज्ञ अखंड प्रवाही ठेवतांना ज्ञानोबा आनंदाचे आवारात विश्वासाठी पसाभर दान मागतांना "एरवी तरी मी मुर्खू" असे अक्षरे लिहितात तर कळस तुकोबा "लहानाहुनी लहान" होऊन बुडणाऱ्या, सैरभैर, पथभ्रष्ट झालेल्या सामान्य जणांना योग्य मार्गावर आणण्यासाठी अंगावर दगड गोटे झेलून त्याच दगडावर "आनंदाचे गाव जवळच आहे" याची शब्दोशब्दी अनुभूती देतात.

माय बाप वाचकहो, मनुष्य हा केवळ मरणाचा सन्मित्र नसून तो आनंदी जीवनाचा निष्ठावंत साथी आहे. त्यासाठी एका एका शब्दाची बांधणी करतांना आपल्याला माय मराठी आणखी समृद्ध करावी लागेल. पूर्वजांनी लावलेल्या सुंदर वृक्षाला सिंचित करून अगोदरच्यापेक्षाही सुंदर फुले-फळे कशी लागतील( ?), त्याच्या सोबतीने महाराष्ट्र देशातच काय जगात आणखीन कसा शोभायमान दिसेल( ?) यासाठी आपण मोठ्या जबाबदारीने काम करावे लागेल. असे करतांना उच्च शिक्षित आणि लेखकांची जबाबदारी वाढली आहे. जीवनातील सुख-दुःख दोन्ही सुंदर, प्रभावीपणे प्रकट करण्यासाठी आपल्याला जबाबदारी घ्यावी लागेल. आज महाराष्ट्र मन जात-धर्म-पंथ-भाषा इत्यादीच्या क्षणिक, अशाश्वत बाबींनी दुभंगू न देता ते कायम अभंग ठेवावे लागेल! तसे लेखन, भाषण आणि वर्तन करावे लागेल. असे होणे म्हणजे महाराष्ट्र आणि मायबोली कायम देदीप्यमान राहणे होय! जय महाराष्ट्र! माय मराठी चिरायू होवो!

# महाराष्ट्राच्या निर्मितीचा संघर्षमय इतिहास



प्रा.बरसमवाड विठ्ठल
गोकुळवाडी. ता. मुखेड

आधुनिक केसरी

**106 जनांची आहुती देऊन महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. त्या सर्वांचे आज स्मरण व्हावे, त्या निमित्ताने लिहिलेला हा संघर्षमय इतिहास.. न्यायाधीश एस, के,दार यांच्या अध्यक्षतेखाली 17 जून 1947 रोजी भाषावार प्रांत रचना करण्यासाठी दार कमिशनची स्थापना केली, पण हा प्रश्न सुटला नाही,म्हणून एक त्रिसदस्य समिती स्थापन केली त्यात पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, आणि पट्टाभीसितारामय्या यांचा समावेश होता.पण ही समिती फेटाळली गेली. त्यानंतर जनजागृतीसाठी सेनापती बापट यांनी महत्त्वाचे कार्य केले. आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या ठराव मांडला त्यात 50 सदस्या पैकी 35 मतांनी तो मंजूर झाला.**

29 डिसेंबर 1953 रोजी राज्य पुनर्रचना आयोग स्थापन केला आणि 1953 साली नागपूर करार होऊन पश्चिम महाराष्ट्र,विदर्भ मराठवाड्यासह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली.1956 च्या दुरूस्तीप्रमाणे कलम 371(दोन) चा समावेश संविधानात करण्यात आला. मराठी भाषिक मुंबई येथे एकत्रित येऊन शंकर देव यांच्या नेतृत्वाखाली लोकांनी प्राणपणाने विरोध केला. त्यावेळी ते म्हणाले "महाराष्ट्र पासून मुंबई वेगळी केली जाणार नाही". त्यावेळी अनेक महिलांनी आंदोलनात उत्स्फूर्तपणे सहभागी झाल्या. त्यात सुमतीबाई गोरे, इस्मत चुगताई, दुर्गा भागवत, तारा रेड्डी,चारुशीला गुप्ते, कमलाताई मोरे, सुलताना जोहारी पुढे कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे,एस,एम,जोशी यांनी ठराव मांडला. मुंबई विदर्भासह संयुक्त महाराष्ट्र व्हावा ही सर्वांची इच्छा होती ५० हजार लोक आंदोलनात सहभागी झाले.21 नोव्हेंबर 1955 रोजी लाक्षणिक संप पुकारला. पुणे येथे 6 फेब्रुवारी 1956 रोजी केशवराव जेधे यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली. त्यात अनेक कर्तृत्ववान व्यक्तीने मोठे योगदान दिले. त्यामुळे हे आंदोलन खेड्यापाड्यापर्यंत पोहोचले.आता नाहीतर कधीच नाही म्हणून लोकांनी आंदोलन यशस्वी करण्यासाठी जमा झाले. त्यावेळी राज्य शासनाने चिडून जन समुदायावर बेछूट गोळीबार केला त्यात राज्यातील 106 सुपुत्र हुतात्मे झाले. एक नोव्हेंबर 1956 ला द्विभाषिक मुंबई राज्य अस्तित्वात आले. 30 नोव्हेंबर 1957 रोजी प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरूंच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतापगडावरील अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. प्रल्हाद केशव अत्रे ना,ग,गोरे जयंतराव टिळक, यांनी सर्व परिस्थिती व लोकांच्या भावना प्रधानमंत्र्या पर्यंत कळविल्या. त्यावेळी केंद्र सरकारने महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीला अनुकूलता दर्शवली. श्रीमती इंदिरा गांधींनी महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीला हातभार लावला आणि शाहीर अण्णा भाऊ साठे, शाहीर अमीर शेख, शाहीर द. ना. गवाणकर यांनी लोकांच्या मनात चैतन्य निर्माण केले व त्यांच्या लेखणीतून जनजागृती केली गेली त्यामुळे 1मे 1960 रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. असा हा संघर्षमय इतिहास महाराष्ट्र राज्याच्या आपल्याला पुढील पिढीला सांगता यावा. 106 हुतात्म्यांचे स्मारक मुंबईत फ्लोरा फांऊटनजवळ उभारले आहे ते सतत आपल्याला संघर्षाचे स्मरण करून देईल. महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून मा. यशवंतराव बळवंतराव चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांनी महाराष्ट्र राज्याची मान उंचावेल असे कार्य केले. म्हणून आज महाराष्ट्र हे समृद्ध व बलशाली राष्ट्र म्हणून उभे आहे. महाराष्ट्राच्या विधानसभेत 288 व विधान परिषदेत 78 आमदार आहेत. महाराष्ट्राची राजधानी मुंबई असून उपराजधानी नागपूर आहे. आज महाराष्ट्रात 36 जिल्हे असून पुणे ही सांस्कृतिक तर पंढरपूर ही धार्मिक राजधानी आहे. शैक्षणिक दृष्ट्या महाराष्ट्र हा प्रगतीपथावर आहे. अनेक खेळाडूंना महाराष्ट्राने ऑलिम्पिक मध्ये पाठविले आहे. महाराष्ट्राने ही विश्वकप जिंकून आणला आहे. महाराष्ट्राचा गौरवशाली इतिहास आणखी उंचवण्यासाठी तरुणाने सर्व क्षेत्रांमध्ये आपले कार्य उत्स्फूर्तपणे दाखवून दिले पाहिजे. बुद्धिबळ,हॉकी ,कब्बडी कुस्ती या खेळात विशेष प्राविण्य मिळवावे. महाराष्ट्रा पुढे असणारे अनेक ज्वलंत प्रश्न तरुणांना भेडसावत आहेत. दहशतवाद,साम्राज्यवाद हा नष्ट केला पाहिजे. समाजामध्ये समानता आणण्यासाठी आपण सर्वजण एक आहोत याची जाणीव ठेवावी. सर्वांनीच मतदान करावे.महिलांना सन्मानित करावे, मतदानापासून कोणीही वंचित राहू नये.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# पाण्यासाठी तरसावं लागतं आमचं पुण वाटून घ्या..!

## भोकर: वाडी तांड्यावर भीषण पाणीटंचाई; सीईओ करणवाल यांच्याकडे मांडली व्यथा

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** तालुक्यात पाणी टंचाई निवारणासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी बहाल करूनही जनतेचा घसा ओला होत नाही. भविष्यात यातून सुटका करण्यासाठी तोडगा काढला असला तरी आज घडीला मात्र भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. थोडफार पाणी मिळाल की जीव शांत होते बघा. पाण्यासाठी अक्षरशा तरसाव लागत आहे. आमची झोप उडाली असून ताई तुम्ही तरी आमचं पुण वाटुन घ्या. आमची थोडीशी कीव येवू द्या अशी केवीलवाणी विनंती महिलांनी मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांच्या कडे सोमवारी (ता.२९) केली आहे. नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांनी सोमवारी तालुक्यातील टंचाईग्रस्त गावांना भेटी देऊन ग्रामस्थांशी संवाद साधला आहे. टंचाईवर उपाययोजना करून जनतेची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी ते काय निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. तालुक्यात मोठ्या प्रमाणात जलसंधारणाची कामे करण्यात आली असली तरी त्याची योग्य अंमलबजावणी झाली नसल्याने योजना कुचकामी ठरली आहे. एकमेव सूधाप्रकल्प सोडला तर दूसरा प्रकल्प नाही. परिणामी भुगर्भातील पाणी पातळीत वाढ होत नाही. सध्या जलजिवन मशिन योजनांची कामे ग्रामपंचायत स्तरावर यूध्दपातळीवर सुरू झाली.संबंधित कंत्राटदारांनी अर्धवट कामे केल्याने ग्रामस्थांना नाहक त्रास सहन करावा लागतो आहे. याची दखल घेवून कंत्राटदारांना श्रीमती करणवाल यांनी चांगलीच तंबी दिली आहे. सदरील रेंगाळलेली कामे कधी पूर्ण होतील याची प्रतिक्षा आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती करणवाल यांनी लोकसभा निवडणूक संपतात तालुक्यात टंचाईग्रस्त भागातील गावांना भेटी दिल्या यात प्रामुख्याने खरबी, पांडूरणा, बेंबर, जांभळी, गारगोठवाडी, जाकापूर, जाकापूर रेल्वे तांडा समावेश आहे. तेथील ग्रामस्थ व महिलांशी संवाद साधत टंचाईबाबत समस्या जाणून घेतल्या. तालुक्यात आज घडीला २५ गावात टंचाईचा सामना करावा लागतो आहे. टंचाई संदर्भात जनतेची गैरसोय होऊ नये म्हणून ते काय निर्णय घेतात याकडे लक्ष लागून आहे.

# कविता पाठवण्याचे बार्टीकडून आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव जसा सामाजिक, आर्थिक, राजकीय सांस्कृतिक क्षेत्रावर पडला तसाच तो साहित्यिक क्षेत्रावरही मोठ्या प्रमाणावर पडला. प्रारंभिक काळात महाराष्ट्रातील साहित्यिकांनी कविता,कथा, नाटक, आत्मचरित्र इत्यादी लेखन प्रकारातून विपुल प्रमाणात साहित्यनिर्मिती केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांनी दिलेला मानवमुक्तीचा विचार हीच या साहित्याची प्रेरणा होती. मानवमुक्तीचे न्याय, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या तत्वावर नवसमाज निर्मितीचे स्वप्न साकारण्यासाठी महाराष्ट्रातील साहित्यिकांनी जी साहित्य निर्मिती केली त्याचा प्रभाव इतर भाषिक राज्यांवरही झालेला आहे. त्यातून विविध भाषा तसेच बोलीभाषेमध्ये देखील अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणात साहित्यनिर्मिती झाली आहे. हे विचार जनसामान्य माणसापर्यंत पोहचविण्यात कवी, गायक, शाहीर, साहित्यिक, कलावंतांचे मोठे योगदान आहे.या सर्वांच्या योगदानाची दखल घेऊन त्यांनी लिहिलेल्या कविता,गझल,अभंग, अखंड,ओवी, छक्कड, शाहिरी, रुबाया, हायकू, चारोळी, भारुड, पोवाडा, लोकगीते इत्यादी सर्व काव्य प्रकारचे संकलन करून महामानव विश्वकाव्य दर्शन हा काव्यसंग्रह मोठया प्रमाणावर एकत्रित करुन संपादित करून ग्रंथरूपाने प्रकाशित करण्याचे प्रस्तावित आहे. याद्वारे जाहीर आवाहन करण्यात येते की, यासंदर्भात विविध भाषेतील काव्य निर्माण केलेले असल्यास याची प्रत डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था (बार्टी), 28 क्वीन्स गार्डन, पुणे 411 001 या पत्यावर किंवा VISHWAKAVYABARTI@GMAIL.COM या मेल आयडीवर पाठवावे अथवा (+91) 9404999452 या (व्हॉट्सअप) क्रमांकावर दिनांक 31/05/2024 पर्यंत आपले काव्य पाठवावे.सदर कविता साहित्यिकांच्या नावाने बार्टी वेबसाईटवर प्रसद्धि करण्यात येईल. तरी सर्वांनी आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन बार्टी संस्थेचे महासंचालक सुनिल वारे यांनी केले.

# खैरे यांना सर्वपक्षीय दिव्यांग कृती समितीचा पाठिंबा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे लोकप्रिय उमेदवार चंद्रकांत खैरे यांना सर्वपक्षीय दिव्यांग कृती समितीने जाहीर पाठींबा दिला. शिवसेनेच्या माध्यमातून महानगरपालिका, जिल्हापरिषद आदी स्थानिक स्वराज संस्थेच्या विविध कल्याणकारी योजना मिळवून देण्यासाठी मदत केली. यावेळी सर्वपक्षीय बैठकीत एकमताने निर्णय घेऊन मध्यवर्ती प्रचार कार्यालयात पाठींब्याचे पत्र दिले. यावेळी माजी महापौर नंदकुमार घोडेले, शिवसेना महानगप्रमुख रेणुकादास उर्फ राजू वैद्य, उपशहरप्रमुख दिग्विजय शेरखाने, माजी नगरसेवक सचिन खैरे, लक्ष्मण गिरे, उपजिल्हासंघटक जयश्री लुंगारे, शहर संघटक विद्या अग्निहोत्री, उपशहर संघटक राज्यश्री पोफळे, सुषमा यादगिरे, सर्वपक्षीय दिव्यांग सेनेचे जिल्हा अध्यक्ष शाहू चित्ते, सुदाम दामले, गजानन रेणुके, मदनकुमार इंगळे, अशोक हिवर्डे, विनय जीवनवाल, प्रशांत वाघमारे, अनिल तरटे, अकबर पठाण, अजय कारके, ज्ञानेश्वर एकनुरे, गजेंद्र शिंदे, प्रभाकर जगताप, राजेश गायकवाड, विष्णु राऊत, बालाजी तिवारी, तालिब चाऊस, रियाज शेख, सुरेश पवार, अशोक जैस्वाल आदींसह दिव्यांग बांधव उपस्थित होते.



# अगोदर आमची तहान भागवा; मग आमच्याकडे मतांची भीक मागा

## टंचाईग्रस्त नागरिकांचा सवाल ?

आधुनिक केसरी न्यूज

**महेश तारमळे**

**ठाणे :** मुरबाड तालुक्यातील १२५ ग्रामपंचायती मधिल नागरिकांना पिण्याचे पाण्याची सुविधा उपलब्ध होण्यासाठी व महिलांच्या डोक्यावरील हंडा कमरेवरही न ठेवता हर हर नल- हर घर जल .हे अभियान राबविण्यात येत आहे.त्यासाठी १२५ गावात तब्बल २०० योजनांसाठी सुमारे १७३ कोटी देखील खर्च केले. परंतु मुरबाड तालुक्यातील कोट्यवधी रुपयांच्या योजना या केवळ कागदावरच असल्याने महिलांची पाण्यासाठी होणारी भटकंती रोखणार केव्हा हा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे. तालुक्यातील पाणी टंचाई दुर करण्यासाठी सन २००५ ते २०१० दरम्यान तब्बल १८९ योजना राबविण्यात आल्या.

मात्र ठेकेदारानी त्या योजना गिळंकृत केल्याने त्यांचे विरोधात मुरबाड पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले असुन ते आजपर्यंत गुलदस्त्यात असताना मागीलवर्षी डिसेंबर २०२३ मध्ये केंद्र सरकारने पाणी टंचाईवर मात करण्यासाठी व तालुका टॅंकर मुक्त करण्यासाठी जल जीवन मिशन अंतर्गत हर घर नल ,हर घर जल हे अभियान राबविण्यासाठी १२५ ग्रामपंचायत मध्ये असणाऱ्या वाड्या पाडे,मधिल नागरिक पाण्यापासून वंचित राहू नये यासाठी २०० योजना साठी १७३ कोटी रुपये अनुदान दिले.दरम्यान २०० योजना या केवळ तीन ते चार ठेकेदाराना देण्यात आल्याने त्यांनी किती प्रमाणात कामे केली याचा अंदाज न घेता सुमारे पंचाहत्तर टक्के रक्कम देखील शासनाने दिली.त्यामध्ये २०० पैकी फक्त ४० योजना या कागदोपत्री पुर्ण झाल्या आहेत.परंतु तेथे पाणी पुरवठा होतो की नाही हा संशोधनाचा विषय आहे. दरम्यान सासणे,मिल्हे,दुधनोली,रामपुर कळभांड,म्हाडस,मोहघर, तोंडली, केदुर्ली, सायले, शिळंद, म्हसा, खांडपे या ठिकाणी राबविण्यात आलेल्या योजना सध्या तरी कागदोपत्री दिसत असुन या गावांसह फणसोली, सुकाळवाडी,नागाव, शिंदीपडा, वाल्हीवरे, कुंभाळे, फांगुळगव्हाण, आंबेमाळ, एकलहरे, दुर्गापुर,बांगरवाडी, गुमाळवाडी, विढेपाडा, चिंचवाडी,अशा गावात व परिसरातील आदिवासी वाड्यात जानेवारी पासून सालाबादप्रमाणे भिषण पाणी टंचाई निर्माण होत असुन नागरिकांना रोजगारापेक्षा पिण्याचे पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. या नागरिकांना पिण्याचे पाणी मिळावे यासाठी ग्रामपंचायत कडून पंचायत समिती कडे टॅंकर मागणीचे प्रस्ताव आलेले आहेत. परंतु एप्रिल महिना उजाडला तरी टॅंकर येत नसल्याने पाण्याची समस्या मोठी गंभीर बनली आहे. त्यामुळे येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत आता सर्वच पक्ष मतांचा जोगवा मागण्यासाठी शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचतील परंतू तेथे गेल्यावर एकच संतप्त सवाल उपस्थित केला जाईल की,अगोदर आमची तहान भागवा. मग आमच्याकडे मतांची भीक मागा....

!मुरबाड तालुक्यातील २०० योजना पैकी चाळीस योजना पुर्ण झाल्या आहेत तर उर्वरित प्रगतीपथावर आहेत .ज्या गावात तिव्र पाणी टंचाई आहे .त्यांचे प्रस्ताव वरिष्ठांकडे मंजुरी साठी पाठविण्यात आले आहेत . एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात टॅंकर ला मंजुरी मिळाल्यास पाणी पुरवठा सुरु केला जाईल . **जगदिश बनकरी, उप अभियंता पाणी पुरवठा विभाग पंचायत समिती मुरबाड )**





# रघुनाथराजेंचं भाषण ऐकल्यानंतर मला धक्का बसला : शरद पवार

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**तरडगाव :** महाविकास आघाडीचे माढ्यातील उमेदवार धैर्यशिल मोहिते पाटील यांच्या प्रचारार्थ फलटण येथे जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी या सभेला मार्गदर्शन करण्यासाठी माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.शरद पवार यांनी भाषणाच्या सुरुवातीलाच श्रीमंत रघुनाथराजे नाईक निंबाळकर यांनी केलेल्या भाषणाकडे विशेष लक्ष वेधले.आज रघुनाथराजेंचं भाषण ऐकल्यानंतर मला धक्का बसला असे शरद पवारांनी म्हटले.जे काही दुखण मांडलं गेलं.त्याची नोंद आपण घेऊया असा विश्वास सुध्दा शरद पवारांनी व्यक्त केला.यावेळी मंचावर माजी उपमुख्यमंत्री व माढ्याचे माजी खासदार विजयसिंह मोहिते पाटील,माढ्यातील महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार धैर्यशिल मोहिते पाटील, रघूनाथराजे नाईकनिंबाळकर, शिवांजलीराजे नाईक निंबाळकर, अनिल देसाई व इतर उपस्थित होते.

शरद पवार म्हणाले की,मी फलटणला अनेकदा आलो असेल,कधी कार्यक्रमाच्या साठी असेल,रामराजेंच्या बरोबर असेल,त्याशिवाय राजकिय कामाच्या साठी सुध्दा आलो असेल,निवडणुकीच्या साठी आलो असेल,या फलटणचा अनेक वर्षाचा अनुभव माझ्या सारख्याला आहे.पण आज पहिल्यांदा रघुनाथराजेंचे भाषण ऐकल्यानंतर मला धक्का बसला,की हे सईबाईंचे ऐतिहासिक फलटण आणि स्वातंत्र्याच्या नंतर त्या स्वातंत्र्याचा अर्थ लोकांच्या जीवनामध्ये समजावा यासाठी ज्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा श्वास चाले पर्यंत केली.त्या मालोजीराजे नाईक निंबाळकरांचे हे फलटण, त्याचा एक आदर आणि आस्था आम्हां लोकांच्या मध्ये होती.इथून सहा आठ किलोमीटर सोडलं तर फलटणची हद्द संपते,आणि बारामतीची हद्द सुरू होते.त्या बारामती मध्ये गेली छप्पन वर्ष मी महाराष्ट्राच्या विधानसभे मध्ये,कधी विधानपरिषदेमध्ये,कधी लोकसभेमध्ये,कधी राज्य सभेमध्ये,तिथे लोकांचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मला जनतेने दिली.आणि शेजारी जे काही चाललंय, लोकांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी रामराजे असोत किंवा संजीवराजे नाईक निंबाळकर असोत यांचा अखंड प्रयत्न आहे.ही स्थिती मला ठाऊक होती.पण आज रघुनाथराजेंचं भाषण ऐकल्यानंतर फलटण आणि परिसरातील लोक रोज संकटाचा सामना हे करत आहेत.हे याठिकाणी स्पष्ट झालं आहे.सत्ता येते.पण ती लोकांच्या साठी वापरायची असते. जमिनीवर पाय ठेवून त्या सत्तेकडे बघायचं असतं.असे सुद्धा त्यांनी सांगितले. पुढे शरद पवार म्हणाले की,सत्ता जर डोक्यात शिरली.तर पाय सुद्धा जाग्यावर राहत नसतात.डोक्यात शिरलेली सत्ता चुकीच्या पद्धतीने वापरली गेली तर सत्तेवर बसविणारा जो सामान्य नागरिक आहे.तो सहन करतो.पण त्याच्या सहन करण्याला मर्यादा असतात.ज्या दिवशी मर्यादेचे उल्लंघन होतं त्यावेळेला ज्यांच्या डोक्यात सत्ता शिरलेली आहे.त्यांना त्यांची जागा दाखविण्याचे काम लोकशाहीमध्ये हा सामान्य माणूस करतो.त्यामुळे जे काही दुखण मांडलं गेलं.त्याची नोंद आपण घेऊया.आणि योग्यरीतीने लोकांची सुटका कशी होईल यासाठी आपण काळजी घेऊयात.असे माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी म्हटले. रघुनाथराजे नाईक निंबाळकर म्हणाले की,पवार साहेबांनी तुम्हाला रामराजे दिला म्हणून फलटणचा दुष्काळ संपला.६५ किलोमीटरचं धोम बलकवडीचं काम रामराजेंनी केलं.शंभू महादेवाच्या पायथ्यापर्यंत केलं.पाणी नेहून पोहचवलं. रणजितने काढलेला कारखाना सुद्धा त्याच पाण्यावर काढलेला आहे.कारखान्याचं घाण पाणी सोडून पंधरा गांवं बरबाद करून टाकली.कुठलाही अधिकारी त्याच्यावर कारवाई करत नाही. पंधरा गावातील पिकं जळून गेली आहेत.पिण्याच्या पाण्याचं आवर्तन आलं.ते सगळं त्यांनी स्वतःचे तलाव भरून घेतले. स्वतःच्या भावाचा एक तलाव भरून घेतला.दुष्काळाने पिसलेली जनता अजून भरडली जाऊ नये म्हणून रामराजेंनी ठरविले की जे होईल ते होईल आपण निदान सत्तेबरोबर तरी राहू,काहीही उपयोग झालेला नाही.कारण समोरची सगळी झुंडशाही होती. आता ह्या निवडणुकीमध्ये ही अपप्रवृत्ती दूर करायची.असे सुद्धा त्यांनी आवर्जून सांगितले.वाट्टेल ते करायचे,फरार गुन्हेगारांना बाहेर काढायचं,हवी ती दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न

# देशाला विकासाच्या धर्तीवर नेण्यासाठी भाजपाला मतदान करा

## अर्चनाताई पाटील यांच्या प्रचारार्थ धाराशिव येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सभा

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** आज देशात लोकशाहीचा उत्सव सुरु आहे, त्यासाठी संपूर्ण भारत देश सध्या सज्ज झाला आहे. देशाचं भवितव्य ठरवणाऱ्या या लोकसभा निवडणुकीत देशासह महाराष्ट्रातील मोठ्या नेत्यांची प्रतिष्ठाही पणाला लागली आहे. सतत आज भाजपचे आमदार राणा (दादा) पाटील यांच्या पत्नी सौ. अर्चनाताई पाटील या अजित पवार यांच्या गटा कडून धाराशिव मतदारसंघातून घड्याळ या चिन्हावर निवडणूक लढवत आहे. आज त्यांच्या प्रचारार्थ धाराशिव येथे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सभा झाली. या सभेसाठी जिल्हाभरातून तसेच बार्शी तालुका व लातूर तालुका मधून लाखोच्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता. आज सभेला संबोधित करतेवेळी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर हल्लाबोल करताना देशाला विकासाच्या धर्तीवर नेण्यासाठी भाजपाला मतदान करण्याचे आवाहन केले.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा सत्कार पालकमंत्री तानाजी सावंत, प्रफुल्ल पटेल, राणा जगदीश सिंह पाटील, बसवराज पाटील, बार्शीचे आमदार राजाभाऊ राऊत, भाजपचे आमदार अभिमन्यू पवार, शिंदे गटाचे सुरज साळुंखे, सतीश चव्हाण, विक्रम काळे, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रवादीचे सुरेश बिराजदार, महेंद्र धूरगुडे, भाजपचे दत्ताभाऊ कुलकर्णी, नितीन काळे, तुळजापूरचे भाजपचे सुनील चव्हाण, राष्ट्रवादीचे सुरेश पाटील, दत्ता अण्णा साळुंखे यांच्यासह बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

पंतप्रधान मोदी यांनी भाषण करतेवेळी हर नळ या योजनेसह मराठवाडा मध्ये सर्व शेतकऱ्यांच्या शेताला पाणी येणार अशी ग्वाही दिली. शेतकऱ्यांनी शेती मध्ये नॅनो युरिया,नॅनो डीएपीचे महत्व पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांना पटवून दिले. देशाला आत्मनिर्भर भारत बनवण्याचे स्वप्न आहे, असे मोदींनी भाषण करतेवेळी बजावून सांगितले.




# जरंडी येथे प्रचार सभेत मंत्री दानवेंना लाभार्थींनी विचारला जाब

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील जरंडी येथे दोन वर्षांपासून आम्हा शेतकऱ्यांना केंद्रीय मंत्र्यांच्या सभेत लाभार्थ्यांनी आक्रमक पवित्रा घेतल्यामुळे काहीवेळ मोठा गोंधळ निर्माण झाला होता. या प्रकाराची माहिती लागलीच जिल्हाभरात पसरली. दुष्काळात धान्य मिळत नाही, आमचे रेशनचे धान्य बंद केले आहे. ८० कोटी लोकांना केंद्र सरकारने धान्यवाटप केल्याच्या गप्पा नका सांगू, आमचे धान्य का बंद आहे ? त्याचे उत्तर द्या. याबाबत सरकार दरबारी प्रश्न मांडा, असा जाब महायुतीचे जालन्यातील उमेदवार, केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांना लाभार्थीनी विचारला. जरंडी येथे सोमवारी झालेल्या प्रचार सभेदरम्यान हा प्रकार घडला. मंत्री अब्दुल सत्तारदेखील या सभेला उपस्थित होते. दानवेंनी आधी ऐकून तर घ्या, ऐकल्याशिवाय कसे समजेल असे उत्तर देऊन वेळ मारून नेली. प्रचार सभेत दानवे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील ८० कोटी जनतेला २०२२ पर्यंत मोफत रेशनचे गहू व तांदूळ दिले. तेव्हा आम्हाला दोन वर्षांपासून रेशनचे धान्य मिळत नाही ते आधी सुरू करा. आमच्याकडे तीन एकर शेती आहे. दुष्काळात धान्य मिळत नाही, त्यामुळे काय खावे, असा जाब दोन्ही मंत्र्यांना लोकांनी विचारला. अचानक प्रश्न उपस्थित झाल्याने मंत्री दानवे, सत्तार यांच्यासह भाजपचे स्थानिक सिल्लोड, सोयगाव व सावळदबारा परिसरातील पदाधिकारी उपस्थित होते.

# श्री रंगनाथ महाराज परभणीकर गुरुजींनी वेदांत सरळ सोप्या आणि मार्मिक भाषेत समजवला : प. पू. गोविंद देव गिरी

आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी. रामपूरकर**

**जिंतूर :** वेदांतचे गाढे अभ्यासक वेदांत केसरी श्री रंगनाथ महाराज परभणीकर गुरुजींनी यांनी वेदांत सरळ सोप्या आणि मार्मिक भाषेत समजवला असे विचार श्रीराम जन्मभूमी न्यासा चे कोषाध्यक्ष प. पु. श्री गोविंद देव गिरी यांनी म्हटले आहे. आज परभणीत श्री रंगनाथ महाराज समाधी मंदिर येथे महा अभिषेक पूजन निमित्त गोविंद देव उपस्थित होते.

अध्यात्मिक क्षेत्रात नाव लौकिक आणि वेदांतावर प्रभूत्व ठेवत अत्यन्त साध्य सरळ आणि सोप्या मार्मिक भाषेत गुरुजींनी वेदांत शिकवला आता त्यांच्या समाधी स्थळी वेदांता चं शिक्षण उपलब्ध करून द्यावे आशि सूचना त्यांनी या वेळी केली. आर्य वैश्य समाज परभणी आयोजित रंगनाथ महाराज परभणी कर गुरुजी यांच्या समाधी ला महा आभिषेक कार्यक्रम उत्तम संम्पन्न झाला त्या बद्दल प पु श्री गोविंद देवगिरी महाराज यांनी समाधान व्यक्त केले आणि महा सभेसभेचे राज्य उपाध्यक्ष श्री सुधीर अण्णा पाटील यांचा सत्कार करून त्यांना आशिर्वाद देण्यात आला या वेळी महासभेचे राज्य अध्यक्ष श्री नंदकुमार गादेवार राज्य संघटक प्रदीप कोकडवार स्वामी चे भक्त काळे आणि वेद शास्त्री बाळु गुरु आसोलेकर यांच्या सह ब्रम्ह वृंद आणि समाज बांधव महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या .



# केंद्र सरकार शेतकरीविरोधी : शरद पवार

आधुनिक केसरी न्यूज

**सातारा :** देशातील शेतकरी वर्ग आज अस्वस्थ आहे. मिळालेली सत्ता ही जनतेच्यासाठी वापरायची असते. सध्या देशातील शेतकरी मोठा संकटात आहे मात्र केंद्र सरकार शेतकऱ्यांकडे लक्ष देत नाही आहे असा हल्लाबोल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी केला. सातारा लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार शशिकांत शिंदे यांच्या प्रचारार्थ सभा पार पडली. यावेळी शरद पवार साहेब बोलत होते. शरद पवार म्हणाले की, १० वर्षापूर्वी मी कृषी खाते सोडलं आणि मोदींचे राज्य आले. या दहा वर्षात त्यांनी शेतीसाठी काय केलं? आज देशातील शेती संकटात आलीये, अनेक प्रश्न निर्माण झालेत. दिल्लीत प्रवेश करणाऱ्या रस्त्यावर देशभरातील शेतकऱ्यांनी शेतमालाला किंमती नीट मिळाव्यात यासाठी आंदोलन करायचं ठरवलं. याठिकाणी लोक हजारोंच्या संख्येने आले. यात केंद्रातील मोदी सरकार शेतकऱ्यांशी विचारविनिमय करेल अशी अपेक्षा होती. पण त्यांनी ढुंकून बघितलं नाही. पण पंजाबचा शेतकरी हा बहाद्दर होता. ही मंडळी संपूर्ण एक वर्ष याठिकाणी होती. शेवटी सरकारला नाईलाजाने हे धोरण मान्य करावे लागले. सरकारने शब्द दिला, निर्णय घेतले पण त्या निर्णयाची शंभर टक्के अंमलबजावणी केली नाही. त्यामुळे अनेक संकट वाढत आहेत, असेही शरद पवार म्हणाले. पुढे शरद पवार म्हणाले की, इंग्रजांच्या काळात सातारकर घाबरले नाहीत. मात्र,किरकोळ लोकांच्या समोर सुद्धा घाबरणार नाहीत. आपण यशवंतराव चव्हाणांच्या विचारांचे पाईक आहोत. छत्रपतींच काय बोलायचं? कॉलर उडवायचं म्हणजे आधी सकाळ आहे का? संध्याकाळ आहे? हे बघावं लागतं. त्यांच्या विषयी जास्त बोलण्याचे कारण नाही. आम्ही गादीचा सन्मान करतो,पण मत देताना मत गादीला देत नाही, असेही शरद पवार यांनी सांगितले. यावर सविस्तर बोलताना शरद पवार म्हणाले की, शशिकांत शिंदे हे कष्ठकरी कुटूंबातले आहेत. आज त्यांना लोकसभेची उमेदवारी दिली आहे. तुमच्या पाठिंब्यावर ते यशस्वी होतील. हे भ्रष्टाचार घालवू म्हणतात, मात्र भ्रष्टाचार घालवायचा ज्यांनी प्रयत्न केले त्यांच्या कारवाई केली गेली. सत्तेचा गैरवापर कसा करतात याची उदाहरणं त्यांनी दिली. त्यांना धडा शिकवण्याची ताकत सातारकरांमध्ये आहे असेही शरद पवार म्हणाले. शरद पवार म्हणाले की, गुजरातमध्ये मोदी मुख्यमंत्री असताना एका भगिनीच्या घरात हल्ला झाला. अत्याचार केले गेले,त्यांच्या सास-यांची हत्या करण्यात आली. यात ११ वर्षांची शिक्षा झाली. मात्र, मोदी सत्तेवर आल्यानंतर त्यांची सुटका केली आणि गळ्यात हार घालून सन्मान केला. स्त्रीयांची अब्रू घेणा-यांचा सन्मान करण्याचं धोरण जे स्विकारतात ते देशाचे हितचिंतक असू शकत नाही. त्यांना मत मागण्याचा अधिकार नाही असे शरद पवार यांनी म्हटले आहे.

# माळी समाजाचा डॉ. शोभाताई बच्छाव यांना जाहीर पाठींबा

## भाजपाला धडा शिकवण्याचा मेळाव्याप्रसंगी माळी समाज बांधवांचा निर्धार

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** जिल्हा माळी समाजा मार्फत माळी समाजाचे प्रलंबित प्रश्न राजकिय पटलावर घेण्याच्या उद्देशाने धुळे जिल्हा माळी समाजाचा भव्य मेळवा केशरानंद गार्डन, देवपूर येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी धुळे लोकसभा मतदार संघांतील माळी समाजाचे निर्णय प्रक्रियेत महत्वाची भूमिका बजविणारे अनेक तोलामोलाचे नेते व कार्यकर्ते उपस्थित होते. धुळे लोकसभा मतदार संघाच्या महाविकास आघाडी व इंडिया आघाडीच्या अधिकृत उमेदवार डॉ. शोभाताई बच्छाव यांना पाठिंबा देण्याच्या उद्देशाने धुळे ग्रामिण चे आमदार बाबासाहेब कुणाल जी पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विधानसभा संघटक ललित माळी यांच्या पुढाकारने सदर माळी समाजाच्या भव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी राजकिशोर तायडे, प्रा. ए. जी. माळी, प्रा. विलास पाटील, मिलिंद सोनवणे, श्री पांडुरंग माळी आदी माळी समाजाच्या मान्यवरांनी माळी व ओबीसी समाजाच्या समस्या मांडल्या.

यावर डॉ. शोभाताई बच्छाव यांनी माळी समाज बांधवांना संबोधित केले की, माळी व ओबीसी समाजास 'सामाजिक न्याय' मिळवून देण्यास महाविकास आघाडी व इंडिया आघाडी कटीबध्द आहे व राहील. यासाठी इंडिआ आघाडीचे नेते मा. राहुल जी गांधी साहेबांनी ' ओबीसी जनगणनेचा' प्रमुख मुद्दा अजेंड्यावर घेतला आहे. ओबीसी समाजास 'समाजिक न्याय' मिळवून देण्यासाठी प्रथम ओबीसींची जात निहाय जनगणना करणे आवश्यक असल्याची बाब राहुलजींनी भारत जोडो यात्रेच्या प्रसंगी जाहीर केली. माळी व ओबीसी समाजास त्यांच्या संख्येच्या तुलनेत विभिन्न क्षेत्रात आद्याप सामाजिक मागसलेपणा मुळे समान संधी मिळालेली नाही. जातनिहाय जनगणनेमुळे ओबीसी समाजाचा सामाजिक, शैक्षणिक, राजकिय व आर्थिक स्थर वाढविण्यासाठी शासन स्थरावर कार्यक्रम योग्य रीत्या राबविता येतील. तसेच या व्यतिरिक्त माळी व ओबीसी समाजाचे धुळे मतदार संघांतील अधिक्तम शेतकरी व स्त्री यांच्या समस्या सोडविण्यासाठी 'स्त्रीयांना केंद्र शासनाच्या नोकरीत ५०% आरक्षण, शेतकऱ्यांची कर्ज माफी, खतांवरील १८% जीएसटी माफ या सारख्या महत्वाच्या विषयांमुळे दिलासा मिळणार आहे जे सर्व प्रश्न इडिया आघाडीने अजेंड्यावर घेतले आहे. असे प्रतिपादन डॉ. शोभाताई बच्छाव यांनी माळी समाज बांधवांना केले. भाजप विषमता वादी धोरणांवर चालणारा पक्ष आहे. यापुर्वी आरक्षणास उघड विरोध करणारा भाजप पक्ष ओबीसी समाजाची मोठ्या प्रमाणावर मते मिळवून, ओबीसी व ओबीसी नेत्यांचे खच्चीकरण करत आलेली आहे. आरक्षण देण्यात तांत्रिक अडथळे निर्माण करून भाजप ने ओबीसी समाजास मागील १० वर्षात झुलवत ठेवले आहे. तसेच केवळ निवडणूकी साठी व मते मिळवण्यासाठी ओबीसींचा वापर करून ओबीसींचे शोषण करण्यांचे व सर्व स्थरावर ओबीसी व त्यांच्या नेत्यांचे खच्चीकरण करण्याचा भाजप व आरएसएस चा छुपा अजेंडा आहे त्यामुळे येणाऱ्या निवडणूकीत भाजप ला माळी व ओबीसी समाज धडा शिकवेल. असे इशारा यावेळी माळी समाजाच्या नेत्यांनी दिला. तसेच धुळे लोकसभा मतदार संघांतील सर्व माळी समाज व ओबीसी समाजास महाविकास आघाडीच्या उमेदवार डॉ. शोभाताई बच्छाव यांना मतदान करून भरघोस मतांनी विजयी करण्याचे आव्हानीत केले.

यावेळी डॉ.शोभाताई बच्छाव व आमदार कुणाल बाबा पाटील यांनी धुळे जिल्हा माळी व ओबीसी समाजातील नव्या दमाचे युवा नेतृत्व ललित माळी यांच्या संघटन कौशल्याचे तसेच उत्कृष्ट मेळाव्याचे आयोजन केल्या बद्दल कौतूक करून भावी वाटचालीच्या शुभेच्छा दिल्या. धुळे जिल्हा वकिल संघाचे कार्यकारणी सदस्य पदी निवडून आलेल्या ॲड. गजानन माळी यांचा सत्कार यावेळी मान्यवरांकडून करण्यात आला.

सदर मेळावा प्रसंगी शिवसेना महानगर प्रमुख डॉ. सुशिल महाजन, धुळे कृ.उ.बा. समितीचे संचालक नानासो. गंगाधर माळी,महेश भाऊ मिस्तरी,मिलिंद सोनवणे,प्रा विलास पाटील,प्रा.अण्णा गजमल माळी,राजकिशोर तायडे,डॉ बी बी माळी,दिनेश नरेंद्र माळी,श्री शरद माळी कापडणे,जितेंद्र मधुकर माळी,पांडुरंग पुना माळी मा.सरपंच भडणे,युवासेना महानगर प्रमुख मनोज जाधव, संजय माळी, पोपट नाना माळी विकास सोसायटी चेअरमन भडणे दत्तू आबा माळी,भाऊसाहेब माळी,सुरेश दगा माळी,गजानन आधार सूर्यवंशी,छोटू भादू माळी,गोरख देवरे, विकास सूर्यवंशी,चंद्रकांत माळी,हेमंत माळी तुषार आढावे,संदीप झाल्टे आदी मोठ्या प्रमाणात समाज बांधव उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन महाराष्ट्र माळी महासंघांचे जिल्हाध्यक्ष ॲड. जगदिश सुर्यवंशी यांनी केले.

# उन्हाचा तडाखा वाढल्याने रस्ते निर्मनुष्य

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यात व फर्दापूर परिसरात व तालुक्यासह शहरात गेल्या काही दिवसांपासून उन्हाचा तडाखा वाढला असून पारा वाढतच चालला आहे. कडाक्याच्या उन्हामुळे नागरिकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. बाजारपेठेतील वर्दळ कमी होऊन रस्ते निर्मनुष्य झाली आहेत. यंदा मार्चच्या पहिल्या आठवड्यापासून सूर्याचा पारा व चढू लागला. मात्र अधूनमधून ढगाळ वातावरण व वादळी वाऱ्यासह पाऊस पडून हवेत गारवा निर्माण करीत नागरिकांना दिलासा दिला होता. ऐन दुपारच्या वेळी छत्रपती संभाजीनगर ते जळगाव महामार्गावर रस्ते झाले निर्मनुष्य ! रस्तावर सामसूम दिसून येत असल्याचे पाहावयास मिळत आहे.

आता एप्रिल शेवटनंतर उन्हाचा पारा वाढत आहे. आठवडाभरापासून सूर्य आग व ओकू लागल्याचे भासत आहे. रविवारी ३० एप्रिल रोजी ४० अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. दिवसेंदिवस उन्हाचा तडाखा वाढत असल्याने नागरिकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. यंदा एप्रिल न महिन्यात सूर्याचा पारा ४० अंशापार गेल्याने मे महिन्यात काय हाल होतील ? याची चिंता नागरिकांना लागली आहे. व उन्हाचा पारा सातत्याने वाढत असल्याने आवश्यक त्या कामासाठीच नागरिक घराबाहेर पडताना दिसत आहेत.

# आता तुम्हाला जो संघर्ष करायचा तो विकासासाठी : सुनील तटकरे

## मुरुड शहरात आठवले गटातील आंबेडकरी अनुयायांचा जाहीर मेळावा पार...

आधुनिक केसरी न्यूज



**मुरुड :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिका... संघटीत व्हा.. आणि संघर्ष करा हा मूलमंत्र दिला पण आपण शिकलो... संघटीत आहोत... आता तुम्हाला जो संघर्ष करायचा तो आता विकासासाठी... तो संघर्ष... तो विकास तुमच्या पायाशी आणून देण्याचे काम महेंद्र दळवी आणि सुनिल तटकरे करेल असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि रायगड लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार खासदार सुनिल तटकरे यांनी मुरुड येथील आंबेडकरी अनुयायांच्या जाहीर मेळाव्यात व्यक्त केला.

आता संघर्ष कुठला करायचा आहे तर तो दिनांक ७ तारखेपर्यंत करायचा आहे. जी विकृत मनोवृत्ती आपल्या आसपास संविधानाबाबत शंका निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांच्याशी वैचारिक संघर्ष करा असे आवाहन सुनिल तटकरे यांनी केले.

माझ्या रायगड लोकसभा मतदारसंघात असलेली ही बुध्दविहारे म्हणजे आमच्या विचारांची... उद्याच्या भविष्याची... आमच्या आचाराची आमच्या स्वप्नांची... एका प्रकारची ताकद आणि शक्ती देणारी आमची ऊर्जा केंद्रे आहेत असे उद्‌गार सुनिल तटकरे यांनी काढले.

लोकशाही प्रणाली व्यवस्था म्हणजे पाश्चात्य देशातील मुठभर लोकांना मतदानाचा अधिकार आहे. पण तुमच्या आणि माझ्या देशात श्रीमंत असलेल्या उद्योगपतींच्या मतांची किंमत जेवढी आहे तेवढीच किंमत माझ्या सर्वसामान्य नागरिकांना आहे हे समान तत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिले. त्यामुळे हा देश एकसंघ राहिला असेही सुनिल तटकरे म्हणाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली घटना स्वीकारली आणि देशाने प्रजासत्ताक भारत... याचा अर्थ जसे छत्रपती शिवाजी महाराजांचे रयतेचे राज्य होते. प्रजासत्ताक याचा अर्थ प्रजेची सत्ता... हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत होते. प्रजा कोण तर या देशात राहणारा प्रत्येक नागरीक... ती माझी प्रजा आहे हे मानण्याचा मोठेपणा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दाखवला त्यातून हा देश एकसंघ राहिला असे प्रतिपादनही सुनिल तटकरे यांनी केले.

आज आपल्यामध्ये जाणीवपूर्वक संभ्रम निर्माण केला जात आहे. की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले संविधान बदलले जाईल. हे धांदात खोटं आहे हे... ज्या मजबूत सिध्दांतावर तुम्ही - आम्ही उभे आहोत तो लोकशाहीचा सिध्दांत चंद्र - सुर्य असेपर्यंत या देशातील संविधान अबाधित राहिल असा विश्वास सुनिल तटकरे यांनी व्यक्त केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनासुध्दा ब्रिटिशांनी मंत्री केले होते. त्यावेळी बाबासाहेब आंबेडकरांनी पाण्याची, वीजेची, सिंचनाची व्यवस्था करावी लागेल हा विचार स्वातंत्र्यपूर्व काळापूर्वी दिला. त्यांनी घटना दिली त्या बाबासाहेबांना संसदीय लोकशाही व्यवस्था सुरू झाली त्याचवेळी लोकसभेत जाऊ दिले नाही. त्यांना पराजित केलात असा आरोप सुनिल तटकरे यांनी काँग्रेसवर केला. शिव - शाहू - फुले - आंबेडकर यांच्या विचारांचे वारसदार आम्ही आहोत. अनंत गीते तुम्ही आंबेडकरी जनतेला कधी भेटलात का? त्यांचे विचार समजून घेतले का? असा संतप्त सवालही सुनिल तटकरे यांनी केला.

घड्याळ या चिन्हासमोरील बटण दाबून त्यांना प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन आमदार महेंद्र दळवी यांनी केले. मुरुड शहरात आठवले गटाच्यावतीने सुनिल तटकरे यांच्या प्रचारार्थ आंबेडकरी अनुयायांचा जाहीर मेळावा पार पडला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि रायगड लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार खासदार सुनिल तटकरे, अलिबाग - मुरुड विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेंद्र दळवी, आरपीआयचे तालुकाध्यक्ष बबन शिंदे, शिवसेना नेते भरत बेलोसे, भाजप जिल्हा सरचिटणीस महेश मोहिते, आदींसह राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, भाजप, मनसेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

# नकारात्मकतेकडून सकारात्मकतेकडे

आधुनिक केसरी

कथा माझीच...... भूतकाळात डोकावणारी........ वर्तमानाचा आढावा घेणारी आणि परमेश्वराच्या छत्रछायेखाली भविष्यकाळ सुकर असेलच या आशेवर व विश्वासावर नकळत तरंगणारी. माझं बालपण खूप संघर्षात गेलं. हातात खेळणी ऐवजी लेखणी आली. आपण कवयित्रीची भूमिकाही पार पाडणार आहोत, याचा माग मुस ही नसतांना वयाच्या अवघ्या दहाव्या वर्षापासूनच माझ्यातली संवेदनशील कवयित्री जागृत झाली.

आईवर सुरा उगारणारा बाप, रोजची छळवणूक आणि भयग्रस्त बालपणाच्या प्रहारांकडे आत डोकावून बघताना आजही मन अस्वस्थ होतं. घरात केवळ मी, आई, आणि माझी मोठी मावशी. जिन माझंच नव्हे तर माझ्या आईचही 'पालकत्व' स्वीकारलं. केवळ तिच्यामुळे आणि या दोघींनीही दिलेल्या अध्यात्मिक संस्कारामुळे, माझे श्वास तगलेत. आज पर्यंत स्वतःशी संघर्ष, वेदनांशी संघर्ष, यामुळेच खूप कमी वयात परिपक्वता आली. परित्यक्ता आईची परिपक्व मुलगी. घरच्यांची जबाबदारी पेलण्याची हिंमत येत गेली. अकराळ विक्राळ आयुष्य त्यामुळे दुःखात होरपळून स्व केंद्रीत झालेली मी. तरीही आईच्या



**सरोज अल्हाट**
अहमदनगर, मो. 8999787948

उदरातून प्रसवतांनाच तिच्याकडून मिळालेली सुप्त ताकद, यामुळेच सेक्रेट हार्ट कॉन्व्हेंट हायस्कूल अहमदनगर या इंग्रजी माध्यमाच्या शिस्तप्रिय शाळेच्या प्राचार्यांकडून, किंडर गार्डन च्या वर्गामध्ये 'A VERY WELL BEHAVED, WELL MANNERED AND INTELLIGENT GIRL' हा प्रगती पुस्तकावर मिळालेला शेरा म्हणजेच माझ्या शैक्षणिक क्षेत्रातील मजबूत पाया म्हणता येईल.

सोशियॉलॉजी मध्ये प्रथम श्रेणीत पदवी. जर्नालिझम, कम्युनिकेशन अँड पब्लिक रिलेशन या अभ्यासक्रमात डिस्टिंक्शन सह सर्वप्रथम क्रमांक. तदनंतर पत्रकार, वृत्तपत्राची उपसंपादिका, कार्यकारी संपादक, अनेक इंग्रजी व मराठी मासिकांची संपादिका असा प्रवास सुरू झाला. तो आज पर्यंत. अनेक नामांकित वृत्तपत्रांमधून विविध विषयावरील लेख प्रसिद्ध झाले. कविताही प्रसिद्ध झाल्या. रेडिओ सिटी पुणे, रेडिओ नगर, आकाशवाणी, महात्मा फुले कृषी वाहिनी इत्यादी ठिकाणी मुलाखती झाल्या. सामाजिक क्षेत्रातही गेल्या २५ वर्षापासून कार्यरत असून अनेक सामाजिक संस्थेच्या माध्यमातून एक पदाधिकारी म्हणून, दलित, शोषित, पीडित, दारिद्र्यग्रस्त, आदिवासी, अंध, परित्यक्ता महिलांचे प्रश्न, आरोग्य समस्या, युवकांचे प्रश्न, कुष्ठरुग्ण, एड्सग्रस्त या व समाजाच्या प्रत्येक घटकांसाठी विकासात्मक व धोरणात्मक कार्यक्रमांमध्ये, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सहभाग. वैयक्तिक पातळीवरही आई मावशी व माझ्याकडून गरजूंना गरजेनुसार मदत व्हायची. अश्रूंच्या पाऊलखुणा, सखे, कविता तुझ्या नि माझ्या व अनन्यता हे चार काव्यसंग्रह प्रकाशित असून स्वर्गीय राजीव गांधी, शंकर दयालजी शर्मा, मदर तेरेसा तसेच अनेक नामांकित साहित्यिकांकडून प्रशंसा. आठवले साहित्य पुरस्कार, राजीव गांधी पुरस्कार, स्वानंद काव्य पुरस्कार, कविरत्न पुरस्कार, राष्ट्र मित्र पुरस्कार, जिल्हा नेहरू युवा पुरस्कार, समाज ज्योत पुरस्कार, अखिल भारतीय पातळीवरील इंग्रजी निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक, यमुना पर्यटनकार बाबा पद्मनजी स्मृती पुरस्कार, अभिनव खानदेश प्रेरणादायी महिला पुरस्कार, इंडियन पिनॅकल आर्ट, आयकॉन नॅशनल अवॉर्ड २०२४ इत्यादी राज्य व देश पातळीवरील पुरस्कारांची मानकरी. आईपणाची ताकद परित्यक्तेच जीवन खंबीरपणे जगली. संकटाशी लढली व मलाही लढायला शिकवलं. सहनशीलता हार न माननं. सशक्त मार्गदर्शक जिन मला माझ्या डेस्टिनेशन पर्यंत पोहोचवलं. स्वसंरक्षणाचे धडे दिले. प्रारब्धालाही हरवलं. खंबीरपणा शिकवला. पाहुणचार, संस्कृती, धार्मिकतेची शिकवण दिली. वैचारिक अधिष्ठान, शिक्षण व कलेला प्रोत्साहन, धारिष्ट्य व नैतिकता हे माझी आई व मावशी यांचे हे गुण माझ्या जडणघडण प्रक्रियेत खूप महत्त्वाची भूमिका बजावतात. म्हणूनच तर हार न मानता सर्व परिस्थितीला सामोरे जाऊन मी यशस्वी होऊ शकले हाच संदेश मला सर्वांना द्यावयाचा आहे.

# बीड लोकसभेकरिता 41 उमेदवार रिंगणात; 14 उमेदवारांची माघार

## 13 मे रोजी 21,42,547 मतदार बजावणार मतदानाचा हक्क

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** 39 बीड लोकसभा मतदार संघासाठी 55 वैध ठरलेल्या उमेदवारांपैकी 14 उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतल्यामुळे आता 41 उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात निवडणूकीसाठी सज्ज झाले आहेत. मतदारांच्या संख्येत वाढ झाली असून आता 21,42,547 मतदार आपल्या मतदानाचा हक्क बजावणार आहेत. 13 मे रोजी सर्वाधिक मतदारांनी आपल्या बहुमुल्य मतदानाचा हक्क बजवावा असे आवाहन उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांनी केले.
बीड येथील जिल्हाधिकारी कार्यालयात 39 बीड जिल्हा लोकसभा निवडणूकीसंदर्भात बोलावण्यात आलेल्या पत्रकार परिषदेमध्ये उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्र कांबळे यांनी बीड लोकसभेकरीता प्रशासकीय माहिती देत मतदारांना मोठ्या संख्येने मतदान करण्याचे आवाहन केले. या पत्रकार परिषदेला मिडीया कक्षप्रमुख अंजु कांबळे निमसरकर यांची उपस्थिती होती. पत्रकार परिषदेत अधिक माहिती देताना उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे म्हणाले की, 39 बीड जिल्हा लोकसभा निवडणूकीसाठी आता 21,42,547 एकूण मतदार असून यामध्ये पुरूष मतदार 11,34,284 असतील तर 10,08,234 महिला मतदार असतील. 29 तृतीयपंथी मतदार आपल्या मतदानाचा हक्क बजावतील. बीड जिल्ह्यामध्ये सर्व्हीस मतदार हे 4516 असून त्यांना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी व्यवस्था करण्यात येणार आहे. बीड जिल्ह्यात एकूण 2355 मतदान केंद्र तैनात करण्यात आलेले आहेत. बीड जिल्ह्यात एकूण 17 संवेदनशील मतदान केंद्र असून त्याठिकाणी प्रशासकीय बंदोबस्त अधिक तैनात करण्यात येणार आहे. 13 मे रोजी 39 बीड लोकसभा निवडणूक अंतर्गत प्रत्यक्ष मतदान चौथ्या टप्यामध्ये होणार आहे. 4 जून रोजी लोकसभा निवडणूकीचे निकाल घोषीत होणार आहेत. अशी माहिती पत्रकार परिषदेमध्ये देण्यात आली.
बीड जिल्ह्यातील 2355 केंद्रांपैकी 55 केंद्रात महिलाराज असणार आहे. याठिकाणी एकही पुरूष अधिकारी कर्मचारी नसून या पूर्ण मतदान केंद्रावर महिला स्वतःहून संपूर्ण प्रक्रिया पार पाडणार आहेत. तर 11 मतदान केंद्र हे दिव्यांगांचे असतील आणि तब्बल 22 केंद्रांवर नवतरूण अधिकारी कर्मचारी यांच्या अधिपत्याखाली मतदान केंद्र असणार आहे.
2014 मध्ये 71.32% मतदान विधानसभेला आणि 68.69% मतदान लोकसभेला झाले होते. 2019 च्या निवडणूकीत विधानसभेमध्ये मतदानाचा टक्का 3%ने कमी झाला होता. 68.20% मतदान झाले होते तर लोकसभेला देखील जवळपास अडीच टक्के मतदान कमी झाले होते. 66.17% मतदान झाले होते. आता मतदानाचा टक्का कमी होवू नये, 75 टक्कयापेक्षा अधिक व्हावा यासाठी प्रशासकीय पातळीवर मतदार जागृतीसाठी नाविण्यपूर्ण उपक्रम राबवण्यात येत आहे. मतदारांनी देखील मतदानाचे महत्व लक्षात घेवून मतदान करण्यासाठी बाहेर पडावे आणि लोकशाहीतील आपला महत्वपूर्ण हक्क मतदानाचा बजावावा असे आवाहन प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.
रासवे संतोष उत्तम, उदयभान नवनाथ राठोड, सादेक हुसेन मोहम्मद, पाराजी तुळशीराम आगे, कोळेकर गणेश भाऊसाहेब, तुकाराम विठोबा उगले, भास्कर किसन शिंदे, विनायक तुकाराम गडदे या अपक्ष उमेदवारांनी निवडणूकीतून माघार घेतली आहे.

**उमेदवारीचा गाजावाजा करणार्‍यांनी नाट्यमय घेतली माघार :** बीड लोकसभा निवडणूकीसाठी पत्रकार परिषद घेवून सोशल मिडीयाच्या माध्यमातून मोठी डरकाळी फोडत आपल्या उमेदवारीचा अर्ज दाखल केला. मात्र काहींचा उमेदवारीचा अर्जच बाद झाला. यामध्ये ओबीसीच्यावतीने ज्यांनी मोठा डंका पिटला त्या यशवंत गायके या उमेदवाराचा अर्जच नाट्यमयरित्या बाद झाला. तर उमेदवारी अर्ज वैध होवूनसुध्दा निवडणूक लढवण्याची मोठी वल्गना करणार्‍या या उमेदवारांनी ऐनवेळी माघार घेतल्यामुळे उलट सुलट चर्चा होत आहे. ज्या उमेदवारांनी माघार घेतली त्यामध्ये भारतीय जवान किसान पार्टीचे अंकुश रामा खोटे यांचा उमेदवारी भरण्याचा दावा अखेर खोटाच ठरला. याबद्दल आश्‍चर्य व्यक्त होत आहे. अखिल भारतीय परिवार पार्टीच्यावतीने ओबीसी नेतृत्व म्हणून ज्यांनी अर्ज दाखल केला होता ते भिमराव जगन्नाथ दळे आणि त्यांच्या पत्नी ज्यांनी दलित सोशील पिछडा वर्ग अधिकार दलच्यावतीने मुक्ता भिमराव दळे यांनी अर्ज दाखल केला होता. या नवरा बायकोचा अर्जसुध्दा नाट्यमयरित्या मागे घेण्यात आला. समनक जनता पार्टीच्यावतीने राष्ट्रवादी काँग्रेसचे बंडखोर रविकांत अंबादास राठोड यांनीदेखील अर्ज दाखल केला होता. मात्र त्यांनीसुध्दा ऐनवेळी माघार घेतली. राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या उमेदवारांची पत्नी सारिका बजरंग सोनवणे यांनीदेखील उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे.

# भाजपाच्या छत्रछायेतील स्वस्तधान्य दुकानदारात फूट

आधुनिक केसरी न्यूज

**महेश तारमळे**

**ठाणे :** मुरबाड तालुक्यातील १९८ शासकिय स्वस्त धान्य वितरीत करणारे दुकानदार गेल्या अनेक वर्षा पासून भाजपाच्या छत्रछायेखाली आहेत सन २००९ ला महाराष्टभर येथील धान्यघोटाळा गाजला होता व त्यात तत्कालीन तहसिलदार अंजली भोसले चार कर्मचारी निलंबित व २२ दुकानदारावर दंडात्मक कार्रवाई झाली होती त्या वेळेस त्यांना आ स्थानिक आमदारांनी भाजपात घेऊन पवित्र केले होते नंतर खा कपिल पाटलांना पंचायततराजमंत्रीपद मिळताच ह्या लॉबिने धसई येथील एका दुकानदाराच्या मांडवात त्याच्या सोबत राहण्याचा विश्वासदिला होता भिवंडी लोकसभा निवडणूका जाहिर होताच भाजपातील अंतर्गतवाद शिंदे गटाची नाराजी पाहता रेशनिग लॉबित ही सरळसरळ दोन गट पडल्याचे बोलले जातंय, रेशनिग दुकानदार हा मतदारा सोबतच थेट दुवा असल्याने या फुटीचा फटका भाजपाला चांगलाच बसून येईल यात शंकाच नाही,अस असलं तरी सध्या हे दुकानदार मोफत धान्य वाटपा सोबत या दुकानदारा कडून मोदीच्या रिकाम्या पिशव्या वाटपाची जाहिरात बाजी करून घेतली गेल आहे,तालुक्यातील ५३ हजार कार्ड धारकांना शासकिय स्वस्तधान्य तांदूळ,गहू,वाटप करणारे दुकान दार एकेकाळी महाराष्टभर भ्रष्टाचाराचे महामेरू ठरून तहसिलदार अंजली भोसले सह चार कर्मचारी निलंबित होऊन २२ दुकानदारावर कार्रवाई झाली होती येथील हि रेशनिग लॉबी व धान्यदलाल हे भाजपाचे असल्याने त्यांना एकप्रकारे धान्यचोरीचा परवाना मिळाला होता ज्या भाजपाने साथ दिली त्याच भाजपाला आता जातीचा फटका बसून येणार आहे.

# पाटोदा परिसरात विनापरवाना अवैध वृक्षतोड सुरु

आधुनिक केसरी न्यूज

**पाटोदा :** येथील वनक्षेत्रातील पाटोदा परिसरात अवैद्य वृक्षतोड सुरु असुन वन कर्मचारी यांचे दुर्लक्ष होत आहे. या बाबत सविस्तर वृत्त असे की, पाटोदा वनपरिक्षेत्रातील नफरवाडी, येवलवाडी, पारगांव, दासखेड, मंझरीघाट, पाचंग्री, सावरगांव इत्यादी गावांमध्ये वनविभागाचे क्षेत्र नसल्याने वनकर्मचार्‍यांची गस्त अत्याल्प प्रमाणात होत आहे. याचा गैरफायदा घेत लाकुड व्यापारी मालकी क्षेत्रातील लिंब, बाभुळ, चिंच, आंबा इत्याद वृक्षांची विनापरवाना तोड करुन अवैद्य रित्या वाहतुक देखील करत आहेत. या गंभीर परस्थितीची नोंद घेवून वन अधिकारी व कर्मचारी यांनी सदर परिसरात नियमीत गस्त करुन अवैद्य वृक्षतोडीस लगाम घालणे गरजेचे आहे.



# चिंचोली मोराची येथे विहिरीत पडलेल्या जखमी मोराला जीवदान



आधुनिक केसरी न्यूज

**कवठे येमाई :** सातत्याने दुष्काळाचा सामना करावा लागत असलेल्या शिरूर तालुक्यातील मोराची चिंचोली येथे मोरांची संख्या अधिक आहे. मोरांना पाहण्यासाठी पर्यटकही या ठिकाणी आवर्जून भेट देत असतात. सध्या वातावरणात उष्णता अधिक आहे. अशातच राष्ट्रीय पक्षी मोरांना काही इजा पोहचली तर सामाजिक संस्थांसह, स्थानिक नागरिक,वनविभाग तत्परतेने दखल घेत असतात. मोराची चिंचोली येथील एका विहिरीमध्ये एक मोर पडल्याचे ग्रामस्थ गोरक्ष नाणेकर व आनंदा पुंडे यांना निदर्शनास आले. त्यांनी त्या मोराला विहिरीतून बाहेर काढले मात्र मोर जखमी असल्याने त्यांनी याबाबतची माहिती निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेचे अध्यक्ष तथा वन्यजीव बचाव टीमचे शेरखान शेख यांना दिली. त्यांनतर शेरखान शेख,स्वप्नील फंड, अमोल कुसाळकर,शुभम वाघ यांनी तेथे येऊन त्या मोराला ताब्यात घेत याबाबतची माहिती शिरुर वनपरिक्षेत्र अधिकारी प्रताप जगताप यांना दिली असता शिरुर वनविभागाचे चालक अभिजित सातपुते यांच्या माध्यमातून मोराला माणिकडोह येथे उपचारासाठी दाखल केले. भारताचा राष्ट्रीय पक्षी असलेल्या एका जखमी मोराला जीवदान मिळाल्याने उपस्थित सर्वांनी समाधान व्यक्त केले.

# वर्दळीचे रस्ते खोदल्याने नागरिक हैराण

आधुनिक केसरी न्यूज

**डोंबिवली :** डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानक परिसरातील सर्वाधिक वर्दळीचे रस्ते सेवा वाहिन्या टाकण्यासाठी खोदण्यात आल्याने जागोजागी वाहन कोंडी आणि या कोंडीने नागरिक हैराण आहेत. या कोंडीतून सुटका करून घेण्यासाठी नागरिक पर्यायी रस्त्यांचा अवलंब करतात. हे रस्तेही खोदून ठेवण्यात आल्याने नागरिकांना मागे फिरल्यानंतर पुन्हा कोंडीचा सामना करावा लागतो. डोंबिवली पूर्व भागातील टिळक रस्ता, सावरकर रस्ता, आगरकर रस्ता सेवा वाहिन्या टाकणाऱ्या ठेकेदाराने खोदून ठेवले आहेत. अचानक वर्दळीचे रस्ते ठेकेदाराने खोदून ठेवल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

# जिल्ह्यातील लोकांची सेवा करण्याची संधी द्या : वैजयंती खैरे

## सिडको हडको भागात पदयात्रा : डोअर टु डोअर घेतल्या मतदारांच्या भेटीगाठी

आधुनिक केसरी न्यूज


**छत्रपती संभाजीनगर :** शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी दिलेली ८० टक्के समाजकारण २० टक्के राजकारण शिकवण पुढं नेली जात आहे. त्यासाठी शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांना महाविकास आघाडीच्या माध्यमातून जिल्ह्यातील लोकांची सेवा करण्याची संधी द्या, अशी विनंती वैजयंती खैरे यांनी केली. सिडको हडको भागात पदयात्रा डोयर टू डोयर घेतल्या मतदारांच्या भेटीगाठी घेतल्या. यावेळी शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हा संघटक प्रतिभा जगताप, उपजिल्हासंघटक जयश्री लुंगारे, नलिनी बाहेती, विधानसभा संघटक मीरा देशपांडे, शहरसंघटक विद्या अग्निहोत्री, उपशहर संघटक राज्यश्री पोफळे, सीमा गवळी, रेखा फलके, रुख्मिणी पवार, कविता मठपती, ऍड. अंजना गवई, पद्मा तुपे, विभागसंघटक सुमन वाघमारे, मनीषा बिराजदार, शाखासंघटक छाया देवराज, मंगल बडगुजर, शोभा साबळे, उज्वला टाक, युवती सेनेच्या जिल्हा समन्वयक निकिता बरथुने, मुक्ता खैरे, प्रज्ञा खैरे, कोमल खैरे, जयश्री खैरे, संजीवनी सावंत आदींसह महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.



# गावागावांत चावडीवर चर्चांना उधाण आता निकालाची प्रतीक्षा

## आमचाच उमेदवार सर्वाधिक चालला ?

आधुनिक केसरी न्यूज



**ज़ैनुल आबेद्दीन**

**मेहकर :** बुलढाणा लोकसभा मतदारसंघाची निवडणूक शुक्रवारी (दि. 26) पोलिस बंदोबस्तात शांततेत पार पडली. ही निवडणूक अतिशय चुरशीची असल्यामुळे आपलाच उमेदवार निवडून लाववी होती. अखेर लोकसभा निवडणूक पार पडली. आमचाच उमेदवार सर्वाधिक चालला, अशा चर्चांना आता उधाण आले आहे. गाव, वस्ती, वाडी, चावडीवर तशा चर्चा रंगू लागल्या आहेत. आमचाच उमेदवार चांगला, असे दावे प्रतिदावे करणाऱ्यांना आता येत्या 4 जूनची वाट पाहावी लागणार आहे. मात्र निर्णय लागेल, तेव्हा लागेल. मात्र सोशल मीडियावर नागरिकांच्या चर्चा रंगू लागल्या. काही महाशयांनी तर कोण निवडणूक जिंकणार, याकरिता शर्यत लावल्याची चर्चा रंगली आहे. शहरातील चौका चौकात अनेक मंडळी आता निवडणूक झाल्यावर नेहमीप्रमाणे एकमेकांत चर्चा करीत आहेत. आमचाच उमेदवार निवडून येणार, बाजी मारणार, आमची सीट एक लाखाने येणार, पुढच्याचे डिपॉझिट जप्त होणार, अशा चर्चांना उधाण आले आहे. काही व्हॉट्सॲप ग्रुपवर असे मेसेज सर्वात जास्त व्हायरल होत आहेत. दावे- प्रतिदाव्यांचे चित्र निवडणुकीच्या निकालानंतर स्पष्ट होणार असल्याचे दिसते.

# गोळेगाव फाटा ते खांडी पिंपळगाव रस्ता खड्डेमय

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद :** तालुक्यातील गोळेगाव फाटा ते खांडी पिंपळगाव रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले असून रस्ता अतिशय खराब झाला आहे तर सुलतानपूर भांडेगाव फाटा ते खांडी पिंपळगाव रस्ता नुकताच डांबरीकरण मजबुती करण काम करण्यात आले. दोन ठिकाणी पुल काम करण्यात आले व नवीन पुलांचे काम सुरू करण्यात आले यात अनेक कामे अपूर्ण स्थीतीत पडून असल्याचे चित्र आहे. गोळेगाव फाटा ते खांडी पिंपळगावपर्यंत रस्त्यांवर ठिकठिकाणी खड्डेच खड्डे पडले असून यावर वाहनधारकांना ये जा करताना मोठी कसरत करावी लागत आहे. जाफरवाडी जवळ नुकतेच नवीन पुलाचे काम सुरु करण्यात आले ते रखडून आहे.खांडी पिंपळगाव नाल्यावर पुलाचे काम पुर्ण करण्यात आले यात कठाड्याला रंगरंगोटी करण्यात आली परंतु पुलालगत सपाटीकरण दोन्ही बाजुने भराव करण्यात आले नाही. तर खांडी पिंपळगाव ते सुलतानपूर भांडे गाव फाटा पर्यंत डांबरीकरण मजबुतीकरण काम करण्यांत आले यात रस्त्यालगत दोन्ही बाजूने भराव करण्यात आले नाही तर भांडे गाव जवळ उभारण्यात आलेल्या पुल काम अपूर्ण स्थितीत पडून आहे पुल संरक्षण कठाड्याला रंगरंगोटी नाही,पुला लगत भराव सपाटीकरण काम अपूर्ण स्थितीत पडून आहे. कामात अनियमितता चालढकल सुरु आहे.उपविभागीय उपाभियंता कोलते यांनी यांकडे लक्ष घालून तातडीने चांगल व पुर्ण काम पूर्ण करुन घ्यावे असी मागणी नागरिकांतून होत आहे.कारण ठेकेदाराकडुन सतत चालढकल सुरु आहे.हे विशेष.




# 'धनंजय मुंडे महापुरुष' त्यांनी आपल्याच पत्नीला जेलमध्ये टाकले : करुणा मुंढे

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** धनंजय मुंढे हे महापुरुष असून त्यांनीच मला जेल मध्ये पाठवून अट्टल गुन्हेगार सारखी वागणूक दिली. समाजातील स्थानिक प्रश्नांशी त्यांना काही देणं घेणे नाही. विचारधारा ही महत्त्वाची आहे. असा घणाघात बीड लोकसभा मतदार संघाचे उमेदवार करुणा मुंढे यांनी केला. यावेळी श्रीमती मुंढे बोलतांना पुढे म्हणाल्या की, मला घराणेशाही चे राजकारण मोडायचे आहे. आणि समाजातील सर्व वर्गातील लोकांना सोबत घेऊन चालायचे आहे. यासाठी मी स्वराज्य शक्तीन सेना या राजकीय पक्षाची स्थापना केली असून कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव मी बीड लोकसभा मतदार संघाची निवडणूक करत आहे. असेही यावेळी करुणा मुंढे अनौपचारिक चर्चेत बोलत होत्या.श्रीमती करुणा मुंढे ह्या वेरूळ येथील अन्नपूर्णा कैलास आश्रम चे मठाधिपती स्वामी अभायानंद महाराज यांचा आशीर्वाद घेण्यासाठी वेरूळ येथे आल्या होत्या.

# चार जणांचा बळी घेणारा वाघ ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** बल्लारशाह वनपरिक्षेत्रात मागील काही महिन्यापासून धुमाकूळ घालत चार इसमाचा बळी घेवून दहशत निर्माण केलेल्या नरभक्षक वाघ टी- ८६- एम ला जेरबंद करण्यात बल्लारशाह वन विभागाला अखेर सोमवार २९ एप्रिलला सायंकाळी ६-३० जेरबंद करण्यात यश आले. मागील पाच वर्षात पहिल्यांदा एवढा मोठा वाघ परिसरात पकडण्याची ही पाहिलच घटना आहे. यामुळे बल्लारपूर शहर जंगलालगत परिसरातील नागरिकांनी आता सुटकेचा निःश्वास सोडला.

बल्लारशाह वनपरिक्षेत्रात मागील काही महिन्यापासून बल्लारशाह-कारवा परिसरात वाघाने चार इसमाचा बळी घेणाऱ्या घटने पासून वन विभाग डोळ्यात तेल ओतून मागोवा घेत होता व त्याला जेरबंद करण्याची मोहीम युद्ध पातळीवर सुरू होती.

वन कर्मचारी हे दररोज वनात दिवस रात्र गस्त घालत होते. अखेर २९ एप्रिला नियतक्षेत्र बल्लाशाह मधील वनखंड क्र. ४९४ मधील ट्रॅप कॅमेरामध्ये सदर वाघ दिसून आला. वनपरिक्षेत्र अधिकारी बल्लारशाह यांनी तात्काळ अधिनिस्त सर्व कर्मचारी यांना सोबत घेऊन वाघाला जेरबंद करण्याची मोहीम राबवत बल्लारशाह - करावा रोडचे वनात सेटअप लावण्यात लावला. त्यानंतर वाघ हा टी-८६- एम असल्याची खात्री करण्यात आली. त्याला सायंकाळी ६-३० वाजताचे सुमारास पशु वैद्यकीय अधिकारी वन्य जीव उपचार केंद्र चंद्रपूर डॉ. कुंदन पोडचलवार यांचे मार्गदर्शनात शूटर अविनाश फुलझेले यांनी वाघाला गणद्वारे डॉट मारले. त्यानंतर सहाय्यक वनसंरक्षक व आदेशकुमार शेंडगे व वनपरिक्षेत्र अधिकारी नरेश भोवरे यांचे नेतृत्व सर्व वन कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने डॉट मारल्यानंतर वाघाची शोध मोहीम राबवली त्यामध्ये सदर वाघ बेशुद्ध आढळला. पशुवैद्यकीय अधिकारी यांनी त्याची तपासणी करून त्यास पिंजऱ्यात बंद करून पुढील तपासणी करता वन्यजीव उपचार केंद्र चंद्रपूर येथे पाठविले. वाघ नर असून तो अंदाजे दहा वर्षाचा असल्याबाबत त्यांनी माहिती दिली.

या मोहिमेच्या यशस्वी आयोजनात उपवनसंरक्षक अधिकारी मध्य चांदा विभाग स्वेता बोडडू यांच्या मार्गदर्शनात सहा वनसंरक्षक अधिकारी मध्य चांदा वनविभाग आदेशकुमार शेंडगे व वनपरिक्षेत्र अधिकारी नरेश भोवरे यांच्या नेतृत्वात क्षेत्र सहाय्यक बल्लारशाह के.एन. घुगलोत, ए.एस. पठाण (उमरी), व्ही.पी. रामटेके (करावा), वनसंरक्षक एस.एम. बोकडे, आर.एस. दुर्योधन, डी.बी. मेश्राम, टी.ओ. कमले, ए.बी. चौधरी, पी.एच. आनकाडे, एस.आर. देशमुख, बी.एम. वनकर, अतीशिग्र दल चंद्रपूर कर्मचारी पीआरटी पथक इटोली, उमरी पोतदार, उमरी तुकुम सातारा कोमटी, सातारा भोसले आणि रोजंदारी वनमजूर यांनी परीश्रम घेवून मोहीम यशस्वीरित्या पार पाडली. यामुळे वाघाला जेरबंद करण्यास वनविभागाला यश प्राप्त झाले. बायोलॉजिस्ट नुरअली सय्यद, रोजंदारी संरक्षण मजूर यांनी दररोज ट्रॅप कॅमेरे चेक करणे व टी- ८६-एम नर वाघाला मागोवा घेण्याची उल्लेखनीय कामगिरी बजावली. याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांचे कौतुक केले आणि बल्लारशाह - कारवा जंगल परिसरात हिंस्र वन्य प्राण्यांचा वावर असल्याने नागरिकांनी वनात प्रवेश करू नये, असे आवाहन केले.





# राजू शेट्टी यांच्या विजयासाठी महादेव मंदिरामध्ये दुग्धाभिषेक

आधुनिक केसरी न्यूज



**संग्रामपूर :** विदर्भातील मतदान प्रक्रिया पार पडल्यानंतर आता याच विदर्भातील स्वाभीमानी शेतकरी संघटनेचे काही पदाधिकारी खा. राजू शेट्टी यांच्या प्रचारासाठी हातकणंगले लोकसभा मतदार संघात गेले आहेत. तर त्यांच्याच विजयासाठी इकडच्या काही महिला कार्यकर्त्यांनी राजू शेट्टी यांच्या विजयासाठी. भगवान शंकराला दुग्धाभिषेक करून निवडणुकीतील विजयासाठी साकडे घातले आहे. संग्रामपूर तालुक्यातील ग्राम बोडखा येथे काल दि. २९ एप्रिल रोजी सौ. वंदना प्रशांत डिक्कर यांचेसह 20 ते 25 महिलांनी गावातील शंकराचे मंदीरात विधीवत दुग्धाभीषेक केला, राजु शेट्टी हे मोठ्या मताधिक्याने निवडून यावे अशी मनोकामना या महिलांनी यावेळी केली. तिस-या टप्याची निवडणुक ७ मे रोजी होत असून याच टप्यात होणाऱ्या निवडणुकसाठी राजु शेट्टी हातकणंगले मतदार संघात उभे आहेत. यापूर्वी त्यांनी दोनवेळा या निवडून येऊन संसदेत या मतदार संघाचे प्रतिनिधीत्व केलेले आहे. तिसऱ्यांदा पुन्हा आता ते आपले नशीब आजमावत आहेत. त्यांच्या प्रचारासाठी स्वाभीमानीचे विदर्भ अध्यक्ष प्रशांत डिक्कर गजानन बंगाळे पाटील यांचे नेतृत्वाखाली विदर्भातील प्रमुख कार्यकर्ते राजू शेट्टी यांच्या प्रचारासाठी हातकणंगले मतदार संघात प्रचारासाठी दारोदार फिरत आहेत. तर महिलासुध्दा त्यांच्या विजयासाठी देवाकडे प्रार्थना करत आहेत एक शेतकरी नेता संसदेत असावा यासाठी आमचा प्रयत्न असल्याचे प्रशांत डिक्कर यांनी माध्यमांशी बोलताना सांगीतले. दुग्धाभिषेक करतांना वंदना डिक्कर यांचेसह बहुसंख्य महिला उपस्थीत होत्या.

# सर्पदंश झाल्याने दीड वर्षीय चिमुकलीचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** मारेगाव तालुक्यातील टाकळी (कुंभा) गावात रात्रीच्या वेळेत घरात सर्पदंश झाल्याने दीड वर्षीय चिमुकलीचा मृत्यू झाला. ही घटना सोमवारी रात्री घडली. काव्या वैभव खेवले असे मृत बालिकेचे नाव आहे.

काव्याला मण्यार या अतिविषारी सापाने दंश केला. ही बाब कुटुंबीयांच्या लक्षात येताच तिला तत्काळ मारेगाव येथील ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र ठिकाणी तिच्यावर योग्य उपचार न झाल्याने तिचा मृत्यू झाल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. वेळेवर उपचार मिळाले असते तर तिचे प्राण वाचवता आले असते, असे ग्रामस्थांनी सांगितले.

ग्रामस्थांनी आरोग्य प्रशासनाला धारेवर धरले असून, काव्याच्या मृत्यूला आरोग्य विभागच जबाबदार असल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे.

सध्या सर्वत्र अवकाळी पाऊस सुरू असून उकडाही वाढला आहे. त्यामुळे साप बिळातून बाहेर पडत आहे. ग्रामीण भागात सर्पदंश झाल्यास तत्काळ औषधोपचार मिळत नसल्याने या सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी आहे.

# धर्माचरणाचे संस्कार हे उपनयनासारख्या संस्कारातून होते

## देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाज मंडळ आयोजित ५१ सर्वशाखीय उपनयन संस्कार संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**संजय व्यापारी**

**छत्रपती संभाजीनगर :** धर्माचरणाचे संस्कार हे उपनयनासारख्या संस्कारातून होते. त्यामुळे आपले सोळा संस्कार हे धर्मसंमत आहेत. अध्यात्मिक व सांस्कृतिक दृष्ट्या या संस्कारांचे पालन करणे महत्त्वाचे मानले जाते. देव, देश आणि धर्म पालनाचे संस्कार यातून रुजवले जातात. धार्मिकदृष्ट्या तर अनन्यसाधारण महत्त्व असलेले हे संस्कार सांस्कृतिक जडणघडणीत महत्त्वाचे ठरतात.

दे. ऋ.ब्राह्मण मंडळ आयोजित ५१ बटुंचा उपनयन संस्कार छत्रपती संभाजीनगर येथील सिडको परिसरातील सप्तपदी मंगल कार्यालयात पार पडला सलग चौथ्या वर्षी हा सोहळा यशस्वीपणे घेण्यात आला. या उपनयन संस्कारात नातेवाईक व मित्र परिवार मिळून साधारण १५०० जण बटुंना आर्शिवाद देण्यासाठी उपस्थित होते तसेच महाराष्ट्र शासनाचे गृहनिर्माण व इतर मागास बहुजन कल्याण मंत्री नामदार अतुल सावे साहेब यांनी उपस्थित राहून बटूस शुभाशीर्वाद दिले व ब्राह्मण समन्वय समितीचे मिलिंदजी दामोदरे, धनंजय पांडे, विजया अवस्थी गीता आचार्य, यांनी सुद्धा उपस्थित राहून बटूस शुभआशिर्वाद दिले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष नरेश जोशी महिला अध्यक्ष मोनिका चौधरी उपाध्यक्ष रवि जेहुरकर, कोशाध्यक्ष अंबादास कुलकर्णी, पदाधिकारी श्रीपाद मुगुटे, प्रशांत दाभाडकर, नरेश पटवर्धन, वैभव देशपांडे, डॉ अमोल पांडव, गोपाळ कुलकर्णी , मिलींद दाभाडकर, पद्माकर कोटचिरकर, तसेच महिला पदाधिकारी सीमा कस्तुरे, उत्कर्शा पारनेरकर, मयुरी दाभाडकर, योगिनी देशमुख, कल्पना जोशी, संध्या मुगुटे, प्रिया कुलकर्णी जयश्री अकोलकर, सुनीता जोशी, दीपा देशपांडे, अलका जोशी, तनिषा पराडकर, रागिणी पुसेगावकर, निता कुलकर्णी, राधिका कुलकर्णी, मानसी, साक्षी दाभाडकर, समृध्दी चौधरी, चैताली जेहूरकर, आर्यन जोशी, तन्वी देशपांडे त्याबरोबरच अभिरवेद इव्हेंट मॅनेजमेंटचे रवींद्र जोशी, स्वानंदी जोशी,यांनी मोलाचे सहकार्य केले. मंदार कुलकर्णी गुरुजी आणि त्यांच्या बरोबर त्यांचा सहकार्यांनी पौरोहित विधीचे कार्य व्यवस्थित पार पाडले. शानदार आयोजन, नियोजनबध्द सोहळा या वैशिष्ट्यामुळे हा उपक्रम संपूर्ण दिवसेंदिवस अधिक लोकप्रिय होत आहे. असे मंडळाचे अध्यक्ष नरेश जोशी व महिला अध्यक्ष मोनिका चौधरी यांनी सांगितले.



# कराड येथे नरेंद्र मोदींच्या उपस्थितीत महाविजय संकल्प सभा संपन्न

## खा. उदयनराजे भोसले यांच्या प्रचारार्थ सभेला अनेकांची हजेरी

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** महायुतीचे सातारा लोकसभा मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार खा.श्री.छ.उदयनराजे भोसले यांच्या प्रचारार्थ करड्या येथे महाविजय संकल्प सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी या सभेस मार्गदर्शन करण्यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे उपस्थितीत होते. यावेळी नरेंद्र मोदी यांनी श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांना निवडुन देण्याचे आवाहन केले. तसेच काँग्रेसवर ही सडकून टीका केली. याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करण्यात आले. संपूर्ण पृथ्वीवर छत्रपती शिवाजी महाराज हे एकमेव राजे आहेत, ज्यांनी राज्यकारभारात लोकांचा सहभाग घेतला. त्यामुळे शिवाजी महाराज खऱ्या अर्थाने लोकशाहीचे जनक आहेत.
समता लोककल्याणाचा विचार अनेकांनी भाषणापुरता मर्यादित ठेवला.
परंतु शिवरायांना अभिप्रेत असलेला समतेचा विचार अस्तित्वात आणण्याचा संकल्प मोदींनी केला.असा विश्वास सुद्धा मोदींच्या नेतृत्वाबद्दल व्यक्त करण्यात आला. याप्रसंगी भाजपचे प्रदेशअध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, पालकमंत्री शंभूराजे देसाई, आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले,आमदार महेश शिंदे, माजी आमदार मदन भोसले,माजी आमदार नरेंद्र पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम, भाजपचे लोकसभा प्रभारी अतुल भोसले, कराड उत्तर विधानसभा प्रचार प्रमुख मनोजदादा घोरपडे, मच्छिंद्र सकटे, भाजप किसान मोर्चाचे राज्य सरचिटणीस रामकृष्ण वेताळ,विक्रम पावसकर, विक्रांत पाटील, भाजपच्या महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष सुरभी भोसले,शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख शारदाताई जाधव, डॉ.प्रियाताई शिंदे, ज्ञानदेव रांजणे, भाजपचे जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम जाधव, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष जयवंत शेलार, कराडचे माजी उपनगराध्यक्ष राजेंद्र सिंह यादव, रयत क्रांती संघटनेचे सचिन नलावडे, भाजपच्या प्रदेश उपाध्यक्ष चित्रलेखा माने कदम, समालोचक जिल्हा सरचिटणीस संतोष कणसे यांची उपस्थिती होती.काँग्रेसचे नेते निवडणुकीपुरत्या अनेक थापा मारतात. मात्र निवडणूक झाल्यानंतर ते मतदारांकडे पाठ फिरवतात.त्यामुळे महाविकास आघाडीची वाटचाल ही अधोगतीच्या मार्गाने सुरू आहे. काँग्रेसने दुष्काळाच्या नावानं मतांचा जोगवा मागितला पण सिंचन प्रकल्प रखडवले. अनेक गावांचा पिण्याचा प्रश्नही सोडवला नाही.अनेक वर्षांच्या सत्तेमुळे काँग्रेस नेत्यांना अहंकार चढला होता, काम केलं नाही तरी जनता आपल्या पाठीशी राहील, असे त्यांना वाटत होते परंतु जनतेने दहा वर्षांपूर्वी परिवर्तन घडवून त्यांना धडा शिकवला आहे. असा विचार सुद्धा या सभेतून मांडण्यात आला.दरम्यान, सातारा जिल्ह्याच्या विकासासाठी महत्त्वाचे असलेल्या पर्यटन विकास, औद्योगिक विकास यासाठी केंद्र सरकारच्या माध्यमातून प्रयत्न करणार असून जिल्ह्यात सुसज्ज आयटी पार्क उभारण्यासाठी निश्चितपणे उपाययोजना केली जाईल. सुशिक्षित तरुणांच्या हाताला काम देऊन त्यांची जन्मभूमी हीच कर्मभूमी ठरावी, यासाठी प्रयत्न करून त्यांचे इतर जिल्ह्यातील विस्थापन थांबवणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या समतेच्या विचारातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताचे संविधान लिहिले आहे. काँग्रेसचे नेते ब्लेम गेम खेळत भाजपवर संविधान बदलाचा आरोप करत आहेत. वास्तविक,पाहता काँग्रेसच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशावर आणीबाणीला लादून संविधानाचा खात्मा करण्याचा प्रयत्न केला होता. असा हल्लाबोल या सभेतून उदयनराजे यांच्याकडून काँग्रेसवर करण्यात आला. केंद्रीय मंत्री रामदास आठवले म्हणाले की,नरेंद्र मोदी हे ओबीसी समाजाचे देशातील पहिले प्रधानमंत्री आहेत. याचे राहुल गांधींना वाईट वाटते आहे. देशातील जनतेला आर्थिक सामाजिक स्तरावर न्याय मिळवून देण्यासाठी नरेंद्र मोदी झटत आहेत.आमदार श्री छ शिवेंद्रसिंहराजे भोसले म्हणाले की,देशाच्या सुरक्षतेसाठी सध्याची लोकसभा निवडणूक अत्यंत महत्त्वाची आहे.उदयनराजेंना मत म्हणजे मोदींना मत असे धोरण राबवणे गरजेचे आहे. भाजप सरकारच्या काळात असंख्य योजना राबवल्या गेल्या मात्र त्यात एक रुपयाचा भ्रष्टाचार नाही. काँग्रेसच्या काळात हे पाहायला मिळत होतं का? आमदार महेश शिंदे म्हणाले की,माथाडी गोरगरिबांना लुटणाऱ्यांना आपल्याला पराभूत करायचे आहे, शेतकरी संस्थेची निगडित हजारो कोटींचा अपहार करणाऱ्या फरार गुन्हेगाराला जनता निवडून देणार नाही. महायुतीच्या सरकारने जिल्ह्यातील इंच ना इंच भूमी सिंचनाखाली आणण्याचा निर्णय घेतला आहे.मच्छिंद्र सकटे म्हणाले की,महायुतीच्या सरकारच्या काळामध्ये मातंग समाजाचे 35 वर्षांपासून प्रलंबित असलेले प्रश्न सुटलेले आहेत. मोदींकडून संविधानाला कोणताही धोका नाही. या सभेला मोठ्या संख्येने जनसमुदाय तसेच महायुती घटक पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.






# द्वारकामाईत बी श्रीनिवास २३ वर्षांपासून सांभाळतात १४२ वयोवृद्धांना

## रक्ताच्या नात्याने नाकारलेल्या वृद्धांचा आधारवड

आधुनिक केसरी न्यूज

**किशोर पाटणी**

**शिर्डी :** शहरात असलेल्या द्वारकामाई वृद्धाश्रमात रक्ताच्या



नात्याने नाकारलेल्या १४२ निराधार वयोवृद्ध महिला व पुरुषांना अविरत २३ वर्षापासून सांभाळ करीत असलेल्या बी श्रीनिवास व सौ सुधा या दाम्पत्याचे कार्य खरोखरच समाजाला प्रेरणादायी ठरत आहे. शिर्डी लगत असलेल्या कणकुरी शिवारात एक एकर जागेवर चार मजली इमारतीत वृद्धाश्रम अविरतपणे २३ वर्षापासून सुरू आहे या वृद्धाश्रमात काहींना मुलांनी नाकारले तर काहींना मुली असल्याने कोणी सांभाळ करत नाही तर काहींना कोणीच नसलेल्या वृद्धांचा या वृद्धाश्रमात सांभाळ केला जातो सध्या या आश्रमात १४२ श्री पुरुष व वृद्ध असून सेवेसाठी जवळपास २५ कर्मचारी २४ तास योगदान देत आहेत वृद्धांचा भोजन व आरोग्याच्या सेवेची जबाबदारी साईबाबा संस्थानने घेतली आहे या वृद्धाश्रमात बाहेरील राज्यापेक्षा महाराष्ट्रातील निराधारांचे प्रमाण जास्त आहे वृद्धाश्रमात धार्मिक सामाजिक सांस्कृतिक कार्यक्रम भजन हनुमान चालीसा साईबाबा आरती स्तवन मंजिरी व मोठ्या टीव्हीच्या स्क्रीनवर धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रम देखील दाखवले जातात. वृद्धाश्रमातील १४२ वयोवृद्ध पुरुषांचा अविरतपणे २३ वर्षापासून सांभाळा करणारे बी श्रीनिवास यांचे



कार्य खरोखरच कौतुकास्पद आहे. या कामात त्यांच्या पत्नी सुधा यांचे मोठे सहकार्य लाभत आहे संस्थापक बी श्रीनिवास म्हणाले की कधी पैशासाठी व संपत्तीसाठी होणारा त्रास तर कधी घरात अडचण तर काहींना कोणीच आधार नाही अशा लोकांसाठी साईबाबांचा आशीर्वाद व दानशूर व्यक्तींच्या सहकार्यामुळे सलग २३ वर्षापासून निस्वार्थपणे आपण हे काम करीत आहे.
या कामात शिर्डी ग्रामस्थांनी देखील मोठ्या प्रमाणावर मदत होते वयोवृद्धांचे निधन झाल्यानंतर अंतिम संस्कार साठी देखील नातेवाईक येत नाही यामुळे हे काम देखील आम्ही आमच्या खर्चाने करतो वृद्धाश्रमातील वृद्धांचा साभाळ करणे जरी पुण्यकर्म असले तरी यात वाढते प्रमाण मनाला वेदनात देणारे असल्याचे खंत त्यांनी यावेळी व्यक्त केली देशभरातील अनेकांनी या आश्रमाला भेट देऊन त्यांच्या कामाचा सन्मान केला आहे.

# कडाक्याच्या उष्णतेचा मानवी जीवनावर परिणाम

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** कडाक्याचे उन्ह उष्णतेचा मानवी जीवनावर व गुरेढोरे प्राणी पशुपक्षांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम जाणवत असल्याचे चित्र आहे. कधि नव्हे ऐवढा कडाक्याचे उन्ह उष्णता उकडा दमटपणा हवामानात बदला मुळे मानव गुरे ढोरे प्राणी पशुपक्षी परेशान त्रस्त सैरभैर झाले आहे. सकाळी दहा वाजेपासूनच तीव्रकडक उन्ह उन्हाच्या झळायाला सुरवात होते तर तद्नंतर कुठलेच कामांसाठी शेतकरी शेतमजुर नागरिक काम करण्याची हिम्मत दाखवु शकत नाही. धजत नाही. त्यातही कामे करण्याचा प्रयत्न झाल्यास भोवळ येणे चक्कर येणे ताप सर्दी पडसा उलट्या चे प्रकार घडत आहे.त्यामुळे मानव गुरेढोरे प्राणी पशुपक्षी सावलीचा सहारा घेत आहे.अधिकची तीव्रता असल्याने सर्वच सैरभैर झाले आहे.कडक उन्हाळ्यामुळे ठिकठिकाणी शितपिये रसवंत्या कोल्ड्रिंक्स थाटल्याने कडक उन्हापासून संरक्षण वाचण्यासाठी थंडपियेचा वापर होत आहे.

# 'उदयन शालिनी फेलोशिप (USF)' कडून आरोग्य शिबिरात २२३ विद्यार्थिनींची तपासणी

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** 'उदयन शालिनी फेलोशिप' (USF) आणि छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था संचलित आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, दंत महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने "रोगनिदान,दंत तपासणी व उपचार महाशिबीर" आयोजित करण्यात आले होते. सौ. सुधा बजाज, सौ. स्नेहल समीर मुळे आणि सौ. शिल्पा शर्मा यांनी या शिबिरासाठी पुढाकार घेतला. यावेळी सौ. सुधा बजाज यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की 'उदयन' म्हणजे उगवता सूर्य. दिल्लीस्थित 'उदयन केअर' ही सामाजिक विश्वस्त संस्था १९९४ मध्ये सुरू करण्यात आली. जिथे समाजातील वंचित, आर्थिक आणि दुर्बल घटकांतील निराधारांना समाजातील मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले जातात. संस्थेतर्फे भारतातील १३ राज्यातील २२ मुख्य शहरात विविध समाजोपयोगी कार्यक्रम राबवीण्यात येतात. संस्थेतर्फे छत्रपती संभाजीनगरमध्ये २००८ पासून अल्प उत्पन्न गटातील गरजू व गुणवंत विद्यार्थिनींसाठी दहावी व पुढील उच्च शिक्षणासाठी "उदयन शालिनी फेलोशिप (USF)" ही शिष्यवृत्ती योजना राबवीण्यात येत आहे. सध्या शहरातील ४०० म्हणून अधिक विद्यार्थिनींना याचा लाभ मिळत आहे.

'उदयन शालिनी'चे प्रमुख वैशिष्ट्ये : मुलींना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहित करून आर्थिक सहाय्य करणे तसेच मानसिकदृष्टया सक्षम करणे, आर्थिक आणि दुर्बल घटकांतील मुलींना स्वयंपूर्ण आत्मनिर्भर बनवण्यासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करणे, वैयक्तिक मार्गदर्शन आणि समूपदेशनात्मक पालकत्व, मुलींना सामाजिक दायित्व साठी प्रोत्साहित करणे. आम्ही विद्यार्थिनींसाठी दंत, रोगनिदान तपासणी आणि उपचार शिबीर घेत आहोत. बऱ्याच विद्यार्थिनींना स्वतःला विकार असून देखील तपासणी करण्यासाठी दवाखान्यात जाता येत नाही. अशावेळी समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन सामाजिक चळवळ निर्माण आणि जनजागृती करून त्या विद्यार्थिनीची तपासणी करणे गरजेचे असते. सौ. स्नेहल समीर मुळे यांनी सांगितले की या मुली म्हणजेचं सुदृढ आणि सशक्त भारत निर्मितीचे मूळ आहे. आरोग्य सवंर्धनासाठी आरोग्य चांगले असेल तरच आपण कोणतेही कार्य किंवा अभ्यास व्यवस्थित करू शकतो. त्यामुळे सर्वांनी आपल्या स्वतःच्या आणि इतरांच्या आरोग्याची काळजी घ्यावी. प्रत्येक विद्यार्थिनीना आपल्या रक्तगट माहीत असणे फार आवश्यक आहे. गरजू विद्यार्थिनीना निरोगी आणि सशक्त जीवन जगता यावे, म्हून अशा प्रकारचे आरोग्य तपासणी शिबीर सात्यताने आयोजित करण्यात येतील, गरजू विद्यार्थिनींना वैद्यकीय सुविधा उपलब्ध व्हाव्यात, हा 'उदयन शालिनी फेलोशिप', छत्रपती संभाजीनगरचा मानस आणि निर्धार आहे.

CSMSS येथील तज्ञ डॉक्टरांमार्फत या रक्तगट तपासणी शिबिरात एकूण २२३ विद्यार्थिनींचे रक्त तपासणी करून रक्तगटाची नोंदणी करून त्यांना रक्तगट कार्ड देण्यात आले. तसेच विद्यार्थिनींना तारुण्य पणात येणाऱ्या आजाराविषयी तपासणी आणि दंत तपासणी यावेळी करण्यात आली आणि त्यांना आजाराविषयी मार्गदर्शन करण्यात आले. CSMSS प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख, दंत महाविद्यालय अधिष्ठाता डॉ. लता काळे, उपप्राचार्य डॉ. जयश्री देशमुख, उपप्राचार्य डॉ. विश्वास कदम, रुग्णालय अधीक्षक डॉ. नरेश निंबाळकर, विभागप्रमुख डॉ. दिपाली आमले, डॉ. अविनाश देशमुख, डॉ. माधवी गायकवाड, डॉ. संध्या यन्नावार, मनुष्यबळ विकास अधिकारी श्री. अशोक आहेर, जनसंपर्क अधिकारी संजय अंबादास पाटील उपस्थित होते.



## अवैध रेती वाहतूक करणारे 3 टिप्पर जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**जैनुल आबेद्दीन**

**मेहकर :** तालुक्यात अवैध रेती वाहतुकीचा चांगलाच जोर दिसून येत आहे. मोठ्या प्रमाणात भरधाव टिप्परने अवैध रेती वाहतूक चालू आहे. मात्र महसूल विभागाचे दुर्लक्ष केल्या जात असल्याची खमंग चर्चा असताना आता मात्र तीन टिप्पर तहसीलदार निलेश मडके यांनी जप्त केले आहे

अवैध रेती वाहतुक करणाऱ्यांना प्रशासनाचा कुठलाच धाक न बाळगता भरधाव दिवसाढवळ्या वाहतूक करून प्रशासनाच्या नाकावर टिचून हा प्रकार चालू होता.मात्र तहसीलदार निलेश मडके यांनी दि 29 एप्रिल रोजी तीन अवैध रेती वाहतूक करणारे टिप्पर पकडले आहेत. हे टिप्पर पोलीस स्टेशन मेहकर येथे पुढील कारवाईसाठी लावण्यात आले आहे.त्यापैकी एका टिप्पर ची पावती तपासण्यासाठी जिल्हाधिकार्यालयाकडे पाठवण्यात आल्याची माहिती आहे, तर दोन टिप्पर मध्ये अवैध रेती असल्याचे निष्पन्न झाले असून सदर टिप्पर क्रमांक एम एच 21 बी एच 7256, असून तर दुसऱ्या क्रमांका टिप्पर एम एच 21 BH,0722, एम एच 21 बीएच 7224, एकूण तीन टिप्पर असून सदर टिप्पर राजू डव्हळे. दत्ता गिरनोर, महेश नळगे यांच्यावर दंडात्मक कारवाई होणार असल्याची तहसीलदार मडके यांनी माहिती दिली आहे. सदर कारवाई मंडळ अधिकारी पंजाबराव मेटांगळे, तलाठी मस्के, तलाठी ठाकरे व कोतवाल मंगेश यांचा समावेश असून पुढील दंडात्मक कारवाईची प्रक्रिया सुरू आहे

मंठा तळणी लोणार मेहकर डोणगाव या भागात दिवसाढवळ्या अवैध रेतीची टिप्पर द्वारे वाहतूक होत असून महसूल प्रशासन यावर कारवाई सौम्य पद्धतीने करत असल्याचे एकत्रित चित्र दिसत आहे इतक्या मोठ्या प्रमाणात अवैध रित्या टिप्पर दारे भरधाव वेगाने वाहतूक केल्या जात आहे मग महसूल विभागातील अधिकारी कर्मचारी ठोस कारवाई का करत नसावेत असे सर्वसामान्य जनतेमध्ये नाराजीचा सूर दिसून येत आहे.

भरधाव अवैध रेती वाहतूक करणाऱ्या टिप्परने लोणार शहरात अवैध रेती वाहनाने एका युवकाचा मागील काही दिवसा आधीच बळी घेतला आहे . सुसाट वेगाने जाणाऱ्या अवैधरीत्या रेती वाहतूक करणाऱ्या टिप्परने स्टेट बँक समोर अंदाजे 22 वर्ष तरुणाला चिरडले होते सदर घटना ही 16 एप्रिल रोजी रात्री आठ वाजता घडली होती सदर टिप्पर वर तहसीलदार गिरीश जोशी यांनी कारवाई केली मात्र या दरम्यान एका निष्पाप युवकाला आपला बळी द्यावा लागला खऱ्या अर्थाने याला जबाबदार कोण..?

**वाळू माफियांनी घेतला बळी :** अवैध रेती वाहतूक करणाऱ्यांची दादागिरी अहो कोतवालाला सुद्धा ट्रॅक्टरने चिरले हो . लक्ष्मण भिकाजी अस्वार वय वर्षे चाळीस राहणार एकलारा बानोदा असे मृत्यू कोतवालाचे नाव होत . गंभीर अवस्थेत उपचार घेत असताना त्यांची प्राणजोत मानवली महसूल विभागाच्या अधिकाऱ्यावर पाळत ठेवून त्यांचे लोकेशन घेऊन तालुक्यात रेतीची मोठ्या प्रमाणावर तस्करी केली जात आहे विशेषता रात्री खेळ चाले त्याप्रमाणे रात्री तस्करी करण्यात येत आहे मात्र शासन प्रशासन गंभीर दखल घेत नसल्याने वाळूमाफ्याची दादागिरी वाढली आहे आणि यामध्ये एका कोतवालाचा अवैध रेती वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरने चिरडून हत्या ची धक्कादायक घटना संग्रामपूर तालुक्यात घडली होती .

**पोलिसांची अवैधरेती वाहतूक रोकण्या रण्याबाबत भूमिका काय..? :** अवैध रेती व गौण खनिज उत्खनन हे जरी महसूल विभागाचे अंतर्गत येत असेल तरी सुद्धा मात्र अवैध रेती गौण खनिज वाहतूक करत असलेल्या वाहनांवर व वाहन चालकावर पोलीस प्रशासन सुद्धा कारवाई करू शकतो..? त्यामुळे पोलीस प्रशासनाने सुद्धा या गंभीर बाबीकडे लक्ष देण्याची गरज असल्याची चर्चा सुज्ञ नागरिकांमध्ये होत आहे . मात्र पोलीस प्रशासन तेरी भी चूक आणि मेरी भी चुप अशी भूमिका घेऊन गप्प दिसून येत आहे .हे विशेष

## शाळापूर्व तयारी मेळावा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज




**जिंतूर :** पांघरी, ता.जिंतुर येथील जि.प च्या उपक्रमशील शाळेत आज दिनांक २९नोव्हेंबर रोजी शाळा पूर्व तयारी मेळावा उत्साहात संपन्न झाला. मेळाव्याचे उद्घाटन सरपंच मीनाताई बुधवंत यांचे हस्ते शाळा व्यवस्थापन समिती पदाधिकारी, पालक यांचे उपस्थीतीत संपन्न झाले. येणाऱ्या शैक्षणिक वर्षात इयता पहिली प्रवेशपात्र बालकांचे शाळेत औक्षण करून स्वागत करण्यात आले,त्यांच्या हाताचे ठसे घेण्यात आले, त्यानंतर वाजत गाजत त्यांची गावातून मिरवणूक काढण्यात आली, मिरवणुकीत ईतर विद्यार्थ्यांनी शैक्षणिक फलक हातात घेऊन घोषणा दिल्या. शाळेत सात स्टॉल लावण्यात आले होते.प्रत्येक ठिकाणी बालकाच्या पूर्व ज्ञानावर आधारित टेस्ट घेण्यात आली. या नावीन्यपूर्ण उपक्रमामुळे पालक देखील भारावून गेले, या मेळाव्यात विशेष आकर्षण होते ते सेल्फी पॉईंटचे. सर्व बालकांचे सेल्फी काढण्यात आले. याप्रसंगी पालकांना देखील मार्गदर्शन करण्यात आले, यानंतर जून मध्ये असाच दुसरा मेळावा घेण्यात येणार असल्याचे मुख्याध्यापक के.सी. घुगे यांनी सांगितले. या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक के.सी. घुगे यांचे मार्गदर्शनाखाली, योगेश लांडगे,श्रीमती श्रद्धा शेंडे, सुनंदा जाधव, विद्या कावटवार,रुपाली नागरगोजे,शिल्पा देशमुख,बालाजी राऊत यांनी परिश्रम घेतले.

## गोदामात दरोडा; रखवालदाराची निर्घृण हत्या

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** वणी येथे यवतमाळ मार्गावरील पळसोनी फाट्याजवळ असलेल्या योगेश ट्रेडर्स या सिमेंट स्टील गोदामात अज्ञात दरोडेखोरांनी दरोडा टाकून तेथे तैनात असलेल्या रखवालदाराचा निर्घृण खून केल्याची खळबळजनक घटना आज उघडकीस आली. रविवारी मध्यरात्री दरोडेखोरांनी गोदामात दरोडा टाकून रखवालदाराचा खून केल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. जीवन विठ्ठल झाडे (६२, रा. आष्टोना, ता. राळेगाव), असे मृत रखवालदाराचे नाव आहे. दरोडेखोरांनी गोदामाच्या आवारात ठेऊन असलेली २४० किलो वजनाची चार सळाखींची बंडलं चोरी केल्याचे सांगण्यात येते.

लालपुलिया परिसरात पळसोनी फाट्याजवळ योगेश ट्रेडर्सचे सिमेंट स्टील गोदाम आहे. सुरेश खिवंसरा यांच्या मालकीचे हे गोदाम असून येथे मोठ्या प्रमाणात लोखंडी सळाखींचा साठा ठेवण्यात आला आहे.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# ओबीसी, एससी, एसटीच्या आरक्षणाला काँग्रेसकडून धोका

## सोलापूर, कराड येथील सभांतून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा काँग्रेसवर तुफानी हल्ला

आधुनिक केसरी न्यूज



**सोलापूर :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याची आणि महाराजांच्या नौदलाच्या शक्तीविषयी संपूर्ण जगाला आदर आहे, पण गुलामगिरीच्या मानसिकतेत गुरफटलेल्या काँग्रेसने मात्र, भारतीय नौदलाच्या झेंड्यावरील ब्रिटीशांचे चिन्ह स्वातंत्र्यानंतरही बदलले नाही. मोदी सरकार सत्तेवर आल्यानंतर नौदलाच्या ध्वजावर छत्रपतींचे मानचिन्ह विराजमान झाले. याच काँग्रेसकडून ओबीसी, दलित, आदिवासी समाजाला घटनेने दिलेल्या आरक्षणाला धोका निर्माण केला जातो आहे, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी सोलापूर, कराड येथील सभांतून काँग्रेसला पुन्हा लक्ष्य केले. सातारा लोकसभा मतदारसंघातील भाजपा - महायुतीचे उमेदवार छत्रपती उदयनराजे भोसले यांच्या प्रचारासाठी कराड येथे झालेल्या सभेत पंतप्रधान मोदी यांनी संरक्षण दलाच्या सामर्थ्याची जाणीव करून देताना, महाराष्ट्र ही शौर्याची, सामाजिक न्यायाची भूमी असल्याचे गौरवोद्गार काढले. आरक्षणाच्या मुद्द्यावरून सध्या सुरू असलेल्या अपप्रचाराचाही मोदी यांनी तीव्र शब्दांत समाचार घेतला. विरोधकांना प्रचारासाठी मुद्दे सापडत नसल्याने आता अपप्रचार सुरू झाला असून सध्या भाजपाच्या अनेक नेत्यांच्या आवाजात, कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करून बदनामीकारक व खोटी वक्तव्ये प्रसृत केली जात असल्याचे सांगून मोदी यांनी या हीन राजकारणाविषयी तीव्र नाराजी व्यक्त केली. अशा अपप्रचारापासून समाजाला वाचविण्यासाठी सावध रहा व असे व्हिडिओ समाजमाध्यमांवर दिसल्यास त्वरित पोलिसांना माहिती द्या, असे आवाहनही पंतप्रधान मोदी यांनी केले. या सभेला केंद्रीय मंत्री रामदास आठवले, भाजपा प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री शंभूराज देसाई, आ. शिवेंद्रसिंह राजे भोसले, भाजपा प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील आदी उपस्थित होते. सातारा ही वीरांची भूमी आहे, या भूमीतील जनतेला आज देशाच्या लष्करी शक्तीचा निश्चितच अभिमान वाटत असेल, कारण आता लष्कराकडे मेड इन इंडिया शस्त्रे आहेत. यामुळेच शस्त्रांच्या दलालांची दुकाने बंद झाली असून विरोधकांची हीच पोटदुखी आहे, असेही ते म्हणाले. देशाच्या अभिमानाला, अस्मितेला आणि एकतेला शक्ती देण्याची ग्वाही मी सत्तेवर आलो तेव्हा जनतेला दिली होती, आणि आता ती पूर्ण केली आहे. मोदी सरकारने सैन्यदलात वन रँक वन पेन्शन योजनाही लागू केल्याचा उल्लेखही श्री. मोदी यांनी यावेळी केला. महाराष्ट्रातील गडकिल्ले आणि ऐतिहासिक ठिकाणांना तसेच देशभरातील सर्व किल्ल्यांचा समावेश जागतिक वारसा यादीत करण्याचे काम सुरू आहे, अशी ग्वाहीदेखील त्यांनी दिली. भारतीय राज्यघटनेने धर्माच्या नावावर आरक्षणास मनाई केली असताना काँग्रेसने मात्र, एका रात्रीत मुस्लिमांचा समावेश ओबीसी यादीत करून त्यांना ओबीसी आरक्षण बहाल केले आणि आता घटनेत बदल करून हीच नीती त्यांना संपूर्ण देशात राबवायची आहे. पण जोवर मोदी जिवंत आहेत, आणि जोवर मोदींना जनतेचा आशीर्वाद आहे, तोवर काँग्रेसचा हा कट यशस्वी होऊ दिला जाणार नाही असा इशारा मोदी यांनी दिला.

त्याआधी सोलापूर मतदारसंघातील भाजपा उमेदवार राम सातपुते यांच्या प्रचारार्थ झालेल्या जाहीर विजय संकल्प सभेतही मोदी यांनी विकासाच्या मुद्द्यावर भर देत काँग्रेसला झोडपले. या निवडणुकीत जनता पुढच्या पाच वर्षांकरिता विकासाची गॅरंटी निवडणार असून 2014 पूर्वी देशाला भ्रष्टाचार, दहशतवाद आणि कुशासनात लोटणाऱ्यांना नाकारणार आहेत, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. असा कलंकित इतिहास असलेली काँग्रेस पुन्हा देशात सत्ता संपादनाची स्वप्ने पाहात असली, तरी जनता त्यांना नाकारणार असून या निवडणुकीत आपला डब्बा गुल झाला आहे याची त्यांना जाणीवदेखील नाही, अशा शब्दांत त्यांनी काँग्रेस आघाडीची खिल्ली उडविली. या सभेला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आ. सचिन कल्याणशेट्टी , आ. विजय देशमुख, आ. सुभाष देशमुख, आ. समाधान अवताडे , नरेंद्र काळे आदी उपस्थित होते. सत्ता मिळाल्यास पाच वर्षांत पाच पंतप्रधान देण्याचा नवा फॉर्म्युला काँग्रेस आघाडीने काढला आहे, या टीकेचा पंतप्रधानांनी पुनरुच्चार केला. इंडी आघाडीला देश चालवायचा नसून केवळ मलई चाखायची आहे, असा आरोपही त्यांनी केला. काँग्रेसची साठ वर्षे जनतेने अनुभवली आहेत, आणि मोदी सरकारची दहा वर्षेदेखील पाहिली आहेत. मागील दहा वर्षांत सामाजिक न्यायासाठी मोदी सरकारने जेवढे काम केले, तेवढे स्वातंत्र्यानंतर काँग्रेसच्या काळात कधीही झाले नाही, त्यामुळे देशातील अनुसूचित जाती-जमाती आणि अन्य मागासवर्गीय समाज त्यांच्या हक्कांपासून वंचित राहिला. मोदी सरकारने ओबीसी समाजाच्या वैधानिक हक्कांचे संरक्षण करण्यासाठी राष्ट्रीय आयोग नेमला, वैद्यकीय महाविद्यालयांत ओबीसींकरिता आरक्षणाची तरतूद केली आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्यांकरिता दहा टक्के आरक्षणही लागू केले, असे सांगून, आरक्षण अधिकाधिक मजबूत करण्यासाठी मी बांधील आहे, अशी ग्वाहीदेखील त्यांनी दिली. घटना बदलण्याच्या आरोपाचाही मोदी यांनी खरपूस समाचार घेतला. खुद्द बाबासाहेब आंबेडकरांना वाटले असते तरी आज ते घटना बदलू शकले नसते, त्यामुळे मी तर बदलू शकणारच नाही, असा पुनरुच्चारही मोदी यांनी केला. आपल्या साठ वर्षांच्या सत्ताकाळात देशातील गरीबांचा विकास रोखण्यासाठी काँग्रेसने परोपरीने प्रयत्न केले आणि या वर्गाचा केवळ मतांकरिता वापर करून घेतला, असा आरोपही त्यांनी केला. आता मोदींवर टीका करणे एवढा एक कलमी कार्यक्रम काँग्रेस आघाडी राबवत असून देशाच्या विकासाबाबत या आघाडीकडे मुद्दे नसल्याने मोदींना शिवीगाळ करणे, संविधान बदलणार, आरक्षण हटविणार अशा खोट्या गोष्टी पसरवून जनतेत संभ्रम माजविण्याचे काम इंडी आघाडीकडून सुरू आहे. आमच्या सत्ताकाळात कोठेही खोटेपणाला वाव नव्हता, हे जनतेने अनुभवले आहे, असेही ते म्हणाले.



# आश्रय छात्रावासाला अकरा हजारांचा निधी

## लग्नाच्या मुहूर्तावर नीलेशनेजोपासली सामाजिक बांधिलकी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** लग्न म्हटलं की त्यावर होणारा मोठ्या प्रमाणावरील खर्च हा आता तसा सर्वत्र चर्चेचा विषय झालेला आहे. लग्न मंडप व डेकोरेशन वर होणारा भव्य खर्च, पाहुण्यांच्या भोजनासाठी असलेले विविध पंचपक्वान्न किंवा सजावटीवर होणारा खर्च यामुळे हल्ली विविध लग्न चर्चेत राहत असतात. परंतु चंद्रपूरमध्ये मात्र निलेश काळे या तरुणाने आपल्या लग्नाच्या शुभमुहूर्तावर चंद्रपुरातील डॉक्टर हेडगेवार सेवा समिती द्वारा संचालित आश्रय छात्रावास या आदिवासी बहुल भागातील विद्यार्थ्यांसाठी चालविल्या जाणाऱ्या छात्रावासाला रोख 11000 रुपयाचा मंगल निधी म्हणून देत समाजासमोर एक नवा आदर्श उभा केलेला आहे निलेश चंपतराव काळे असे या तरुणाचे नाव असून हा तरुण गोंडवाना विद्यापीठ येथे कार्यरत आहे. सामाजिक बांधिलकी जपत असणारा निलेश काळे हा महाराष्ट्र राज्य कर्मचारी महासंघाचा सदस्य आहे . गोंडवाना विद्यापीठ कर्मचारी संघटना गडचिरोलीचा तो उपाध्यक्ष आहे .तर , धनगर अधिकारी कर्मचारी संघटना चंद्रपूर जिल्हा , चंद्रपूरचा उपाध्यक्ष असून लोकसेवा सेवा संस्थेचा तो सचिव आहे. एवढेच नव्हे तर चंद्रपूर बचाव संघर्ष समितीचा ही तो सदस्य असून भारतीय शिक्षण मंडळाच्या चंद्रपूर जिल्ह्यातील विद्यापीठ प्रमुख म्हणून सुद्धा त्याच्याकडे दायित्व आहे. आपल्या कार्याने व शांत संयमी स्वभावाने निलेश काळे हा तरुण सातत्याने विविध उपक्रमात सहभागी होत असतो. त्याच्याकडे असलेल्या विविध दायित्वावरून त्याच्या कार्याचे बहुआयमित्व लक्षात येते. या तरुणाचा नुकताच खामगाव येथील विनोद पाडभाजे यांची सुकन्या स्वाती पाडभाजे हिच्या सोबत विवाह वर्धा येथे पार पडला. तर दुसऱ्या दिवशी स्वागत समारोहाचे आयोजन चंद्रपूर येथे करण्यात आले होते . या स्वागत समारोहामध्ये निलेश काळे यांनी आपली सामाजिक बांधिलकी जपत चंद्रपूर येथील आश्रय छात्रावास चे सचिव एडवोकेट आशिष धर्मपूरिवार यांच्याकडे रोख अकरा हजार रुपयांचा मंगल निधी स्वाधीन केला. चंद्रपुरातील आश्रय छात्रावास येथे आदिवासी बहुल भागातील विद्यार्थी राहत असून केवळ लोक सहभागातून हे छात्रावास चालविले जाते. सरकार द्वारे एकही रुपयाची मदत न घेता चालविल्या जाणाऱ्या या छात्रावासामध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांना आपल्याकडून काही मदत व्हावी हा उदात्त उद्देश डोळ्यासमोर ठेवून निलेश काळे या तरुणाने आपल्या विवाहाचे औचित्य साधत रोख अकरा हजार रुपयांचा मंगल निधी आश्रय छात्रावासाला देत समाजासमोर एक नवा आदर्श निर्माण केलेला आहे. निलेश काळे यांच्या स्वागत सोहळ्याला समाजातील विविध स्तरातील मान्यवर उपस्थित होते . त्याच्या या कार्याचे सर्वच स्तरावरून कौतुक होत असून त्याचा हा आदर्श समाजातील इतर तरुणांनी घ्यावा व समाजाला आपणही काही देणं लागतो याची जाणीव ठेवावी अशी चर्चा उपस्थितांमध्ये होती.

# ऊन-पावसाचा खेळ, उष्माघाताचे तीन संशयित मृत्यू!

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** उपराजधानीत ऐन उन्हाळ्यात अवकाळी पावसाने वारंवार हजेरी लावली आहे. अशातच गेल्या महिन्याभरात नागपुरातील वेगवेगळ्या भागात उष्माघाताचे तीन संशयित मृत्यू नोंदवले गेले आहे. परंतु, मृत्यू विश्लेषण अहवालातूनच या मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल. नागपुरात भर उन्हाळ्यात ऊन-पावसाचा खेळ सुरू आहे. जिल्ह्यातील बऱ्याच भागात अवकाळी पावसासह गारपिटीचीही नोंद होत आहे. त्यामुळे तापमानात सातत्याने चढउतार होत आहे. एप्रिल महिन्याच्या सुरुवातीला नागपुरात उन्हाचा तडाखा वाढला होता. आता अधूनमधून पाऊस पडत असतानाही शहरातील तापमान ३७ अंश सेल्सिअसच्या वर आहे. त्यामुळे दुपारी उन्हामुळे उकाड्याने सगळे त्रस्त होत आहेत. महिन्याभरात ३ बेघर नागरिक मृत्यू झालेल्या अवस्थेत पोलिसांना आढळले. त्यांच्या मृत्यूची नोंद नागपूर महापालिकेच्या आरोग्य विभागाने उष्माघाताच्या संशयित मृत्यूमध्ये केली आहे. त्यापैकी एकाचा मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे तर दोघांचा मृतदेह इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात पाठवण्यात आला आहे.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# चॉकलेटचे आमिष देऊन चिमुकलीवर अत्याचार

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** युवकाने चॉकलेट देण्याचे आमिष दाखवून एका नऊ वर्षाच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार केला. कुणालाही सांगितल्यास आई बाबांना ठार मारण्याची धमकी दिली. ही संतापजनक घटना काचीपुऱ्यात घडली. या प्रकरणी तक्रारीवरून आरोपी दिनेश किल्लारे (३०) रा. काचिपुरा याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवून त्याला अटक करण्यात आली. आरोपी दिनेश कल्लारे हा मूळचा बालाघाट, मध्यप्रदेशातील असून मागील सहा महिन्यांपासून नागपुरात राहात आहे.